# वाङ्मयचौर्य आणि श्रेयचौर्य: एक सिंहावलोकन

**श्रीनिवास ओं. हेमाडे**

तत्त्वज्ञान विभाग, संगमनेर नगरपालिका कला , दामोदर जगन्नाथ मालपाणी वाणिज्य आणि बन्सीलाल नारायण सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर ४२२ ६०५ जिल्हा: अहमदनगर, महाराष्ट्र

shriniwas.sh@gmail.com

PLAGARISM AND CREDENTIL STEALING: A RETROSPECT

SUMMERY

The paper deals with concept of theft in general with a few selected verses in Sanskrit Literature, from its etymological meaning and the idea behind. It deals with the concept of plagiarism in particular with special reference to some thoughts on plagiarism and credential stealing in ancient Indian scriptures and Vaarakari Sampraday in Maharashtra. The research article is devided in thre parts: first deals with the etymology – in englsih and Sanskrit; second deasl with the considerable scope of the concept of plagiarism and the last part deals with the ancient and medival references plagiarism in Sanskrit literature.

"एकाची नक्कल म्हणजे वाङ्मयचौर्य; दोघांची नक्कल म्हणजे संदर्भ"

विल्सन मीन्झर (१८७६-१९३३)[1]

John Oswald

**प्रस्तावना :**

या संशोधन लेखाचे तीन भाग आहेत –

- **भाग एक : चोरी - संकल्पनेचे व्यापक स्वरूप**
- **भाग दोन : वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य संकल्पनांचे व्यापक स्वरूप**
- **भाग तीन : 'संस्कृत' मधील वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्यविषयक विचार : काही संदर्भ**

**भाग एक**

**चोरी : एक संकल्पना – व्यापक स्वरूप**

**चोर आणि चोरी**

चोरी ही जागतिक समस्या आहे. वस्तूंची साधी गरज अथवा तिची तीव्रतेने गरजेची असताना तिचा तुटवडा असणे, तिचा अभाव असणे, किंवा ती आजूबाजूला असणे पण आपल्याला उपलब्ध न होणे, ती अप्राप्य होणे, इत्यादी कारणांमुळे (तिच्या) चोरीची घटना घडते.

चोर म्हणजे चोरी करणारी व्यक्ती आणि चोरी म्हणजे "एखाद्याने आपली स्वतःची नसलेली वस्तू आपल्या ताब्यात घेऊन ती आपली आहे" असे म्हणणे. याचा अर्थ चोर करतो ती प्रत्येक कृती चोरी असते, असे नाही; चोर व्यक्तीच्या इतरांप्रमाणे जगताना होणाऱ्या जैविक कृती - खाणेपिणे, झोपी जाणे, प्रेम इत्यादी कृतीनां चोरी म्हणता येत नाहीत. उलट "आपली स्वतःची नसलेली वस्तू आपल्या ताब्यात घेऊन ती आपण आपली म्हणणे" ही विशिष्ट कृती चोरी मानल्याने अशी कृती करणारी कोणतीही व्यक्ती चोर ठरते. म्हणूनच अचानकपणे एखादी प्रसिद्ध व्यक्तीही तिची चोरी उघडकीस आली की चोर ठरू शकते. त्यामुळे 'चोराची' व्याख्या आणि संकल्पना आरेखित करण्यापेक्षा 'चोरी' या कृतीची व्याख्या आणि संकल्पना आरेखित करणे महत्वाचे आहे. ती निश्चित झाली की त्याप्रमाणे कृती करणारी व्यक्ती चोर आहे, असे म्हणता येते.

**चोरी आणि उचलेगिरी**

चोरी आणि उचलेगिरी यात फरक आहे. चोरी ही जाणीवपूर्वक केलेली कृती आहे तर उचलेगिरी जाणीवपूर्वक केली जाते असे नाही. विशेषतः मुले वस्तू आवडली म्हणून उचलून घेतात. बालके चोर नसतात. पण प्रौढांन हा आजार असू शकतो. गरज नसतानाही "आपण एखादी वस्तू चोरावी" हा एक मानसिक आजार (क्लेप्टोमॅनिया किंवा क्लोपेमॅनिया **Kleptomania** किंवा klopemania) आहे.

चोरी माणूसच करतो, असे प्राथमिक स्तरावर म्हणता येईल. प्रेयसी-प्रियकर हे ह्रदयचोर तर खुद्द ईश्वर; उदाहरणार्थ पांडुरंग हा "पंढरीचा चोर" असल्याचा भास भक्ताला होतो. भारतीय संस्कृतीसह जगातील सर्व संस्कृतींमध्ये सामान्य माणसापासून व्हाया संत, ऋषी, मुनी ते खुद्द ईश्वराने केलेल्या चोरीच्या कथा आढळतात.

**सामाजिक दुरित**

चोरी, वाटमारी, दरवडेखोरी हा अनेक सामाजिक दुरितांपैकी एक प्रकार आहे. सामाजिक दुरिते

अनेक प्रकारच्या दुर्व्यवस्थांमुळे निर्माण होतात. चोरी ही आर्थिक दुरित आहे. समजतील आर्थिक व्यवस्था दुर्बल, अन्यायी, विषमताप्रधान इत्यादी असली की चोऱ्या, फसवणूक, लबाडी इत्यादी घटना घडत राहतात. समाजवादी विचारसरणीनुसार भांडवलशाही ही या साऱ्यांचा पद्धतशीर अर्क आहे.

आर्थिक दुरीतांमुळे जशी चोरी होते, तसे वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य हे सुद्धा बौद्धिक दुरितांमुळे निर्माण होते, असे दाखवून देता येईल. बौद्धिक क्षमतेचा अभाव, बौद्धिक विकलांगता, दुर्बलता ही दुरिते असलेला कवी, लेखक, साहित्यिक चोरी करतो. पण त्याचवेळेस प्रसिद्धीची हाव या दुरिताची भर पडते. अशी निर्बुद्ध माणसे इतर प्रबुद्ध माणसांचे विचार, त्यांचे श्रेय चोरतात. अशी चोरी वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य, अशा दोन्ही प्रकारची असते. अशा साहित्यचोरांची बुद्धी दोन-तीन पातळीवर काम करते.

अ) पहिली पातळी : "आपणास विचार किंवा ज्ञान निर्माण करता येत नाही, विचार सुचत नाहीत", ही साहित्य चोराची स्वतःच्या मर्यादांची जाणीव.

आ) दुसरी पातळी : 'काय चोरावयाचे आहे, कुठून चोरावायचे आहे" याची जाणीव.

इ) तिसरी पातळी : "आता, डल्ला कसा मारायचा, कोणती पद्धती अमलात आणावयाची", याची जाणीव.

चोरी कशी झाली, कुठून झाली हे शोधून काढतात ते साहित्य पोलिस, डिटेक्टीव्ह, खबरे, गुप्तहेर इत्यादि मंडळी. चोराने कुठून, कसे आणि काय काय साहित्य चोरले आहे; त्याचे रुपडे कसे बदलले आहे त्याची चर्चा होते; तर 'वाङमयचोरी म्हणजे काय?" यावर लिहिणारे लेखक चोरीच्या व्याख्या, प्रकार यांची आणि चोरीच्या अपवादाची वर्णने करतात. वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य शोधक किंवा लेखक हे बहुधा साहित्य चोरांच्या तिसऱ्या पातळीची चर्चा करीत असतात.

**फरक व परिणामकारकता**

शिक्षण व संशोधन क्षेत्रातील चोर, दरवडेखोर आणि पैशाची चोरी करणारे म्हणजे आर्थिक क्षेत्रातील चोर, दरवडेखोर ह्यांच्यात एक मूलभूत फरक आहे. आर्थिक चोरी ही चोरीची बळी ठरलेली संबंधित व्यक्तीपुरती मर्यादित राहाते पण संशोधन क्षेत्रातील चोरी व्यापक सांस्कृतिक परिणाम घडविते. ती मूळ संशोधकाची जणू हत्या करते. हे जास्त विघातक असते. आर्थिक नुकसान भरून काढता येते. चोरी व चोर शोधून पैसे परत मिळविता येतात, फसवणूक शोधून दंडासह आर्थिक नुकसानभरपाई होऊ शकते. पण विचारांची चोरी झाली की नुकसानभरपाई मिळणे अवघड जाते. एकाचे विचार दुसऱ्याच्या नावावर गेले की बळी व्यक्तीचे कायमचे नुकसान होते. त्याची परिणामकारकता व्यापक असते.

**पोलिस**

पोलिस म्हणजे चोर व चोरीचा शोध लावून ते प्रकरण न्यायालयात नेणारी व्यक्ती. Police हा इंग्लिश शब्द आहे .Police हा इंग्लिश शब्द पंधराव्या शतकात फ्रेंच भाषेत *police* असा आणि लॅटीन भाषेत *politia* असा आला. त्याचे लॅटीनीकरण *politia असे झाले. ते ग्रीक भाषेतील politeia* चे निष्पादित रूप होते. हे सारे शब्द प्राचीन ग्रीक भाषेतील या *polis* शब्दापासून बनतात. *Polis* चा अर्थ 'शहर' असा होतो. [2] शहर आतल्या आणि बाहेरच्या शत्रूपासून सुरक्षित ठेवणे हा या साऱ्या शब्दांचा समान अर्थ होता. व्यापक अर्थ म्हणजे अर्थ 'सार्वजनिक प्रशासन, सुव्यवस्था राखणे. एका अन्य नोंदीनुसार Police हा इंग्लिश शब्द फ्रेंच भाषेतून अठराव्या शतकात प्रचलित झाला. [3] प्राचीन ग्रीसमध्ये गुलामगिरीची प्रथा होती. ते सार्वजनिक गुलाम असत. हेच तत्कालिन पोलिस होते. त्यांच्यावर गर्दीचे नियंत्रण करणे ही मुख्य जबाबदारी होती. गुन्ह्याचा तपास मात्र संबंधित नागरिकांनीच करावयाचा असे.

आधुनिक अर्थाने police ही संकल्पना प्रथम फ्रेंच राजा लुई चौदावा याच्या कारकिर्दीत १६६७ साली रुजली. पहिले पोलिस अधिकारीपद १५ मार्च १६६७ साली 'लेफ्टनंट जनरल ऑफ पोलिस' या नावाने निर्माण झाले. पोलिस हा शासनाचा नोकर असून पोलिसावर कायदा व सुव्यवस्था राखणे, मालमत्तेचे रक्षण, ही जबाबदारी सोपविलेली आहे .आवश्यक प्रसंगी बळाचा वापर करण्याचेही दिले गेले आहेत.

'पोलिस' हा मराठी शब्द म्हणजे Police या इंग्लिश शब्दाचे *लिप्यंतर* आहे. 'पोलिस' ला संस्कृतमध्ये 'आरक्षक' (एकवचनी आणि बहुवचनी 'आरक्षक:' ) म्हणतात. इतर कोणत्याही भारतीय अथवा विविध जागतिक भाषेत Police या इंग्लिश शब्दाला विविध समांतर संज्ञा असू शकतात. प्रस्तुत संदर्भात Police या इंग्लिश शब्दाला मराठीत 'पोलिस' या मराठी

शब्दाखेरीज प्रतिशब्द उपलब्ध नाही. 'पोलिस' हे *लिप्यंतर* रूपच मराठी मानाने, इतके रुळले आहे. त्यामुळे 'पोलिस' हाच शब्द मूळ Police अर्थाने स्वीकारू.

**चोर आणि पोलिस**

चोर ही खासगी व्यक्ती असते तर पोलिस ही सरकारी सामाजिक यंत्रणा आहे. गुप्तहेर यंत्रणा ही पोलिसी यंत्रणेचा एक भाग असते. पोलिसी खबरे ते लष्करी गुप्तचरसंस्था असा गुप्तहेर यंत्रणेचा व्यापक पट असतो. खासगी गुप्तहेर ही व्यक्ती खासगी असली तरी ती पोलिसी यंत्रणेला पूरक असते. (पूरक नसेल तर ती 'ब्लॅकमेलर' होऊ शकते.) या अर्थाने खासगी गुप्तहेर सुद्धा सामाजिक संस्था आहे, असे म्हणता येईल. 'पोलिस' ही संस्था सरकारी यंत्रणेतील ठळक, उघड पात्र आहे. त्याची लोकांना स्पष्ट सामाजिक जाणीव असते, ती लोकांना माहित असते. पण 'गुप्तहेर' ही संस्था सामाजिक असली तरी ती व्यक्ती मूलतः गुप्तच असल्याने ती व्यक्ती कोण ? हे लोकांना माहित नसते.

चोरांची टोळी असू शकते. 'पेंढारी' ही मध्ययुगीन भारतात सर्वधर्मसमभाव बाळगणारी गुप्त जमात होती. पोलिसांची टोळी नसते. कारण ती यंत्रणा असते.

**चोरीची नैतिक परिमाणे**

कोणती कृती ही चोरी आहे किंवा तो चोरी मानवी, अनैतिक ठरवावी, हे ठरविणे कठीण आहे. गरज ही सामाजिक बाब असल्याने गरजेची वस्तू येनकेन मिळविणे, ही चोरी मानवी की नाही, याचा निर्णय देणे हा मूल्यात्मक पेच आहे. उदाहरणार्थ मार्क्सच्या मते, भांडवलशाही ही छुप्या चोरीवर आधारित समाजव्यवस्था आहे. पण लोकशाहीतही चोरी यथासांग चालू असतेच ! शिवाय भारतीय वर्ण-जाति-लिंगभेदव्यवस्था ही धर्माच्या अवगुंठनाखाली केलेली चोरीच नाही, तर थेट दरवडेखोरीच म्हणता येते.

धनधान्य ते हृदयचोर अशा अनेक वस्तू चोरीचे लक्ष्य असतात. जिची स्वतःला आणि इतरांना गरज आहे किंवा जिला मूल्य आहे, असे वाटते, त्या वस्तूची चोरी करणे, हा चोरीचा केंद्रबिंदू आहे. गरज ही अर्थशास्त्रीय संकल्पना आहे तर मूल्य ही तत्त्वज्ञानात्मक संकल्पना आहे. म्हणून या काटेकोर अर्थाने पाहाता चोरी, ही मूल्यशास्त्रीय (axiological) संकल्पना आहे. सुईसारख्या किरकोळ भौतिक, मूर्त वस्तूपासून अतिभौतिक, अमूर्त ज्ञानापर्यंत चोरीची परंपरा आहे.

**चोरवाङ्मय आणि पोलिसी वाङ्मय**

चोर आणि चोरीच्या कथा सांगणारे, चोरीविषयक लेखन किंवा साहित्य म्हणजे चोरवाङ्मय. त्यात चोर आणि चोरीविषयक प्रत्येक कृती यांचा व्यापक अर्थाने समावेश करता येईल. चोर, चोरीचे प्रकार, चोरीची पद्धती, चोरांच्या टोळ्यांची आचारसंहिता, चोरांचे कौटुंबिक जीवन इत्यादीविषयक कथा, कादंबरी, नाटक, नाटुकली, कविता, चित्रपट इत्यादी साहित्य म्हणजे चोरवाङ्मय. त्याउलट चोर व चोरी शोधणे हा केंद्रबिंदू असणारी कृती म्हणजे पोलिसीकृतीविषयक लेखन किंवा साहित्य म्हणजे *'पोलिसी वाङ्मय'* म्हणू.

संस्कृत, प्राकृत, पाली, अर्धमागधी या प्राचीन भारतीय भाषा आणि मराठीसह इतर अनेक भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये चोरीवर गंभीर, उपहासात्मक ते विनोदी लेखन झाले आहे. मराठीत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या "चोरांचे संमेलन", पासून व्हाया द. मा. मिरासदारांच्या "माझी पहिली चोरी" ते आज, माहित नसलेले अनेक विनोदी लेखक चोरवाङ्मय निर्माण करीत आहेत. महाराष्ट्रात तर देवाच्या आळंदी बरोबर *'चोराची आळंदी'* सुद्धा आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये चोरांचे जीवन चितारणारे अनेक चित्रपटही निघाले. दि ग्रेट ट्रेन रॉबरी ते हिंदीतील 'धूम १,२,३ ...., रॉय, सारखे अनेक चित्रपट आहेत. सर्वात गाजलेली कादंबरी म्हणजे मारियो पुझोची गॉडफादर.

चोराबरोबर येणारी अपरिहार्य गोष्ट म्हणजे तुरुंग, कारावास. मग तुरुंगफोडीच्या कथा (जसे की सध्याचा गाजणारा चित्रपट 'शॉशँक रिडम्प्शन'). हे अगदी घरफोडीच्या उलट असते. तुरुंगफोडीचे हॉलीवूडमधील अनेक चित्रपट गाजले. काही सत्यकथा तर काही कपोलकल्पित कथा. सावधान इंडिया सारख्या अनेक मालिकाही आहेत.

थोडक्यात; चोर आणि चोरी करण्यापासून चोराला धरण्यापर्यंत आणि तो पळून जाण्यापर्यंत अनेक बाजू, पैलू चोर आणि चोरी या दोन घटकाभोवती आहेत. यातील प्रत्येक निर्मितीला चोरीविषयक साहित्य म्हणजे '*चोरवाङ्मय*' म्हणावे लागेल. जितके चोर व चोरी कल्पक तितके 'पोलिसी वाङ्मय' जास्त कल्पक असू शकते.

**भाग दोन**

**वाङ्मयचौर्य आणि श्रेयचौर्य**

सावर चोऱ्यांमध्ये माहितीची चोरी अथवा ज्ञानाची चोरी हा सर्वात गंभीर प्रकार मानता येईल. ही चोरी दोन पातळ्यांवर होते. एक, एका देशाने दुसऱ्या देशाची ***माहिती*** चोरणे. दोन, शिक्षणक्षेत्रात ***ज्ञानाची*** चोरी होणे. देशांच्या गुप्तचरसंस्था विरोधी देशाची माहिती, त्यांचे ज्ञान चोरण्यात व्यग्र असतात. ती कदाचित गरजेची असू शकते. पण ज्ञानाच्या क्षेत्रात, शिक्षणक्षेत्रात ज्ञानाची चोरीचे स्वरूप गंभीर असते. ज्ञानाचीही चोरी होते, हे लक्षात घेतले तर ज्ञानचौर्य ही समाजव्यवस्थेची अवस्था सूचित करणारी बाब आहे. वाङमयचौर्य हा ज्ञानचोरीचाच अनिवार्य हिस्सा आहे. विद्यमान काळात 'वाङमयचौर्य' हे अकादामिक चर्चाविश्वाच्या अग्रभागी आहे. उच्चशिक्षण क्षेत्रात आणि साहित्य क्षेत्रात वाङमयचौर्य होऊ नये, यासाठी अधिकाधिक सजगता बाळगली जात आहे.

**चोरवाङमय आणि वाङमयचौर्य**

चोरवाङमय आणि वाङमयचौर्य या दोन संकल्पनांमध्ये फरक आहे. चोरवाङमय म्हणजे चोरीविषयीचे वाङमय. वाङमयचौर्य म्हणजे वाङमयाची, ज्ञानाची चोरी. प्रस्तुत संशोधन लेखात ज्ञानाची चोरी म्हणजे ***वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य*** या संकल्पनांचा संस्कृत वाङमयाच्या संदर्भात घेतलेला शोध, तिचे प्राचीन, मध्ययुगीन भारतीय संदर्भ, यांचा धांडोळा घेतला आहे.

**भाग (अ)**

**'चोरी' ची संकल्पना : संस्कृत संदर्भ**

**व्युत्पत्ति : चौर्यकर्म, चोरी Plagiarism**

संस्कृतमधील 'चुर्' या धातूपासून चौर्य, चोरी हे शब्द बनतात.[4] चोरीला 'तस्करी' असा एक जुना शब्द आहे. कृ .पां .कुलकर्णी यांच्या मते, 'तस्कर' शब्दाचा मूळ संधी ' तत्' +' कर' असा मूळ संधी असून पाणिनी सूत्रानुसार 'त' चा लोप होऊन 'स' येतोआणि तस्कर शब्द बनतो.[5] व्युत्पत्तिकार वा. शि. आपटे यांच्या मते, तस्कर म्हणजे चोर, लुटेरा.[6] 'चोर, चोरी, चौर्य ' या शब्दांची किंवा संकल्पनांची अनेक सामासिक रूपे पाहाता चोरीचे अनेक प्रकार केले जातात, असे आढळते. वस्तुचोर ते हृदयचोर इत्यादी. 'महाराष्ट्रीय शब्दकोश' मध्ये मला 'चोरी' या संज्ञेची सर्वात मोठी, दीर्घ नोंद आढळली.[7]

**'चोरी' ची संकल्पना**

**व्याख्या**

दुसऱ्याच्या मालकीच्या वस्तू त्याच्या नकळत, संमतीवाचून स्वतःच्या उपयोगाकरिता घेणे म्हणजे चोरी, चौर्यकर्म, किंवा कोणताही जंगम माल, मालकाच्या परवानगीवाचून त्याच्या ताब्यातून त्याच्या नकळत नेणे म्हणजे चोरी.[8] 'लूटमार' व 'दरोडेखोरी' (रॉबरी अँड डकॉइटी) हे जंगम मालमत्तेसंबंधीचे गंभीर तसेच दंडनीय स्वरूपाचे गुन्हे मानले जातात.

**सनातन कल्पना**

चोरी ही कल्पना प्राचीन काळापासूनची आहे. ऋग्वेदात चोर या अर्थी तस्कर, तायू, स्तेन (स्तेन, स्तेयं,) व परिपंथी असे शब्द येतात. 'स्तेयं', 'स्तैन्यं' असेही शब्द आहेत. त्यांचा अर्थ चोरी[9]. (गीर्वाणलघुकोशकार ओक यांनी 'स्तेन' चा अर्थ 'चोर' असा दिला आहेच. पण त्याचा अन्य अर्थ सामर्थ्य आणि बौद्धांचा स्तूप असाही दिला आहे. पुढे 'स्त्येनः' हा एक शब्द दिला आहे.[10] चोर हा शब्द पुढे तैत्तिरीय आरण्यकाच्या शेवटच्या भागात आढळतो.[11] ऋग्वेदातील *चोर* या शब्दाचे वर्णन *'तन्यूतज – वनर्गू'* म्हणजे 'अरण्यात राहून आपला जीव धोक्यात घालणारा' असा आहे.[12] वेदकाळात गुरे पळविणे हा चोरीचा मुख्य प्रकार होता. माणसे पळविणे ही सुद्धा चोरीच समजली जात होती. [13] *अथर्व*वेदात लांडगे, वाघ आणि चोर यांचा उपसर्ग चुकविण्यासाठी उपाय सांगणाऱ्या ऋचा आहेत. याचा अर्थ असा की चोरी ही प्राचीन आणि महत्वाची सामाजिक समस्या आहे. प्राचीन भारतीय कायदेसंहिता समजल्या जाणाऱ्या (?!) 'मनुस्मृती'मध्ये चोरी (स्तेय) आणि साहस (दरोडा) यात फरक करून दोन ते वेगळे गुन्हे मानले आहेत. मनुने[14] त्यांची व्याख्या (मनुस्मृती ८.३३२) दिली ती अशी :

*स्यात साहसं त्वन्वयव त्प्रसभं कर्म यत्कृतम्*
*निरन्वयं भवेत् स्तेयं हृत्वापव्यते च यत्*

अर्थ:

*मालकाच्या समक्ष बलाने त्याच्या धनधान्यादिकांचे जे अपहरण केले जाते त्याला 'साहस' म्हणतात आणि जे मालकाच्या परोक्ष अपहरण केले जाते त्याला 'स्तेय' म्हणतात.*

**मराठी विश्वकोशातील नोंद**

'वाङ्मयचौर्य'**[15]** या संकल्पनेची मराठी विश्वकोशात नोंद घेण्यात आली आहे. ती नोंद श्री. दे.

इनामदार यांनी लिहिली आहे. Plagiarism या इंग्लिश शब्दाचे मराठी भाषांतर 'वाङ्मयचौर्य' असे केले असून त्याचे लिप्यंतर म्हणून 'प्लेजिअरिझम' हा शब्द उपयोगात आणला आहे. त्या अनुषंगाने 'वाङ्मयचौर्य' ही Plagiarism ची आवृत्ती आहे. या नोंदीची मी केलेले पुनर्रचित स्वरूप पुढीलप्रमाणे :

**व्याख्या :**

"एखाद्या लेखकाची मूळ साहित्यकृती पूर्णतः वा अंशतः दुसऱ्या लेखकाने स्वतःच्या नावे प्रसिद्ध करून ती स्वतःची असल्याचे भासविणे, ह्यास 'वाङ्मयचौर्य' म्हणतात. वाङ्मयचौर्य लेखक मूळ साहित्यकृतीचा निर्माता नसतानाही त्या साहित्यकृतीचा निर्माता असल्याचा दावा करतो. मूळ साहित्यकृती लपविणे, किंवा रूपांतरात तिचा मुळीच उल्लेख न करणे, याला वाङ्मयचौर्य असे संबोधतात."

**वाङ्मयचौर्य आणि प्रक्षिप्त वाङ्मय**

"वाङ्मयचौर्याची कृती ही प्रक्षिप्त वाङ्मयाच्या नेमकी उलटी असते. आपले स्वतःचे लेखन सहेतुकपणे पूर्णतः किंवा अंशतः दुसऱ्याच्या, विशेषतः पूर्वकालीन लेखकाच्या नावे, खपविण्याचा जो प्रयत्न असतो; त्यास प्रक्षिप्त वाङ्मय म्हणतात. प्रक्षिप्त वाङ्मय लिहिणारा लेखक स्वतःचे लेखनकर्तृत्व नाकारून ते इतराच्या नावावर दडपतो. याउलट वाङ्मयचौर्य करणारा लेखक दुसऱ्याच्या लेखनाची अंशतः वा पूर्णतः सहीसही किंवा आपली उचलेगिरी लपेल इतके फेरफार करून चोरी करतो आणि ते लेखन आपलेच आहे, असे दडपून भासवितो."

**वाङ्मयचौर्य अपवाद**

या नोंदीत 'काय केले असता' किंवा 'काय केले जाते, तेंव्हा ते लेखन 'वाङ्मयचौर्य ठरत नाही', तेही स्पष्ट केले आहे." ही नोंद सलग निबंधवजा आहे. या लेखनाचे मी वाचकांच्या सोयीसाठी आणि सुलभ आकलनासाठी केलेले आहे. ते पुनर्रचित स्वरूप पुढीलप्रमाणे :

1. इतिहास, पुराणे, मिथ्यकथा, मौखिक लोकसाहित्य आदी साधनांचा कच्ची सामग्री म्हणून आधार घेऊन त्यांवर आधारित स्वतंत्र साहित्यकृती निर्मिल्यास ते वाङ्मयचौर्य ठरत नाही.
2. परभाषेतील एखाद्या साहित्यकृतीच्या मूळ आशयावर वा मध्यवर्ती कल्पनेवर आधारित साहित्यनिर्मिती केल्यास व 'अमुक अमुक साहित्यावर आधारित' असा मूळ साहित्यकृतीचा उल्लेख केल्यास तेही वाङ्मयचौर्य ठरत नाही.
3. कधीकधी दोन लेखकांना एकच कल्पना सुचू शकते. कथा, कादंबरी किंवा नाटक लिहिताना एकाच तऱ्हेचा प्रसंग दोघांनाही सुचणे सहज शक्य आहे. अशा बाबतीत मात्र कोणावरही वाङ्मयचौर्याचा आरोप करणे सयुक्तिक नाही.
4. कोशवाङ्मयादी सर्वसाधारण संदर्भसाहित्याचा उपयोग अध्यापन, संशोधन, वृत्तपत्रीय लेखन इत्यादींसाठी केल्यास तेही वाङ्मयचौर्य म्हणता येणार नाही.
5. काही विषय आणि काही कल्पना वाङ्मयात सर्वसाधारणपणे व संकेतार्थाने रूढ असतात. त्या कल्पनांची व विषयांची वेगवेगळया लेखकांच्या साहित्यकृतींमध्ये अनेकदा पुनरावृत्ती होते, तरीही ते तसे वाङ्मयचौर्य ठरत नाही.
6. कोणत्याही लेखकाच्या वाङ्मयीन जडणघडणीत त्याच्या आधीच्या तसेच समकालीन लेखकांचा व त्यांच्या साहित्यकृतींचा संस्कार होत असतो. त्या साहित्यातील मूळ आशयद्रव्याचे, कल्पनांचे, तंत्र वा मांडणीचे, शैलीचे कळत-नकळत अनुकरण, उसनवारी त्या लेखकाच्या उमेदवारीच्या काळात होत असते. तेही वाङ्मयचौर्य मानता येणार नाही.
7. पण अशी एखादी पूर्वलिखित वा पूर्वप्रकाशित साहित्यकृती जशीच्या तशी हुबेहूब तिचा आशयविषय, मांडणी व शैली यांसहित पूर्णतः वा अंशतः, मूळ लेखकाचा उल्लेख न करता दुसऱ्या लेखकाने स्वतःच्या नावावर छापल्यास ते वाङ्मयचौर्य ठरते.
8. एखाद्या परभाषेतील साहित्यकृतीचा अनुवाद वा रूपांतर मूळ लेखकाच्या पूर्वसंमतिविना तसेच मूळ लेखकाचा व मूळ साहित्यकृतीचा उल्लेखही न करता एखाद्या लेखकाने स्वतःच्या नावाने प्रसिद्ध केल्यास तेही वाङ्मयचौर्य ठरते.

**श्रेयचौर्य**

वाङ्मयचौर्य समस्येबरोबर जोडून येणारी दुसरी समस्या म्हणजे श्रेयचौर्य. एखाद्याचे संशोधन, साहित्य यांची चोरी करता येतेच पण संशोधकाचे, लेखक, कवी, साहित्यिक इत्यादी निर्मात्या व्यक्तीचे श्रेयही चोरता येते. इंग्लिशमध्ये वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य यांना उद्देशून एकच संज्ञा उपयोगात आणली जाते, Plagiarism. या संज्ञेचे लिप्यंतर 'प्लेगॅरिझम'/' प्लेजिअरिझम'. संस्कृत किंवा मराठी अथवा तत्सम भारतीय भाषांमध्ये वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य यात फरक केलेला आढळतो, पण इंग्लिशमध्ये हा फरक आढळत नाही. मराठी विश्वकोशातील 'वाङमयचौर्य' ही नोंद इंग्लिश ग्रंथांवर आधारित असल्याने असा फरक प्रतिबिंबित होत नाही. बहुधा त्या ग्रंथांमध्ये असा फरक केलेला नसावा. आणि संस्कृतमधील संदर्भ घेतले नसल्याने हा सूक्ष्म भेद करणे शक्य झाले नसावे. संस्कृतमध्ये हा फरक दिसून येतो (त्याचे स्वरूप आपण पाहूच).

विश्वकोशातील प्रस्तुत नोंदीत 'श्रेयचौर्य' अशी वेगळी नोंद नाही, पण तिचे साधारण स्वरूप 'वाङ्मयचौर्य' या नोंदीतच स्पष्ट केले आहे. तिलाही श्री. इनामदार यांनी 'वाङ्मयचौर्य' असेच म्हंटले आहे. ही नोंद अशी :

"साधारणपणे बहुतेक साहित्यिक पूर्वप्राप्त उपलब्ध साहित्याचा व संदर्भसाधनांचा आधारभूत कच्ची सामग्री म्हणून उपयोग करतात व तीतून स्वतःच्या सर्जनशील प्रतिभेने अनन्यसाधारण साहित्याची निर्मिती करतात. उदा., जगप्रसिद्ध नाटककार विल्यम शेक्सपिअर ह्याने तत्कालीन इतिवृत्ते, पूर्वप्रसिद्ध साहित्य, घटना-घडामोडी आदी सामग्रीचा वापर करून स्वतःच्या प्रतिभाशक्तीच्या बळावर खास स्वतःचे असे श्रेष्ठ नाट्यवाङ्मय निर्माण केले, त्याचे जनकत्व शेक्सपिअरकडेच जाते. ज्यावेळी एखाद्या साहित्यकृतीचे पूर्णतः वा अंशतः भाषांतर केले जाते; वा त्यातील काही भागांचा वापर केला जातो, त्यावेळी तसा स्पष्ट उल्लेख करणे हे सभ्यतेचे व कृतज्ञताबुद्धीचे लक्षण ठरते. अशी सभ्यता व कृतज्ञताबुद्धी न बाळगता केवळ उचलेगिरी करून केलेले लेखन वाङ्मयचौर्य ठरते."

**निरुद्देश आणि निरुपयोगी वाङमयचौर्य**

'महाराष्ट्रीय शब्दकोश' मधील 'चोरी' या संज्ञेची नोंदीत [16] आपल्या प्रस्तुत वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य या संदर्भात चोराचे आणि चोरीचे काही प्रकार मला आढळले. ते प्रत्यक्षपणे वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य यांच्याशी संबधित नाहीत. पण *अशीही चोरी होऊ शकते*, याचा प्रत्यय येतो. शिवाय कळत-नकळतपणे जवळपास प्रत्येकजण अशा चोऱ्या करीत असतो. त्यात 'खास चोरी' असा उद्देश असतोच असे नाही, तर आळस हा दुर्गुण या ज्ञानचोरीमागे असतो. कित्येकदा अशी नकळत चोरी केली जाणे, ही अबोध सवय असते, एवढेच. ती निरुद्देश आणि निरुपयोगी तर असते; पण उलट तिच्यामुळे तोटाच होतो. सर्वात मोठा धोका म्हणजे अशा सवयीतून विनाकारण पाठभेद निर्माण होतात आणि वाद निर्माण होऊ शकतात. या तऱ्हेच्या चोरीमुळे लेखनपूर्णता हा लेखनविषयक सद्गुण धोक्यात येतो. आणि असे :

1. कलमचोर : लिहिताना काही अक्षरे, काही भाग, काही गोष्टी वगळणारा, त्या न लिहिता दाबून ठेवणारा, सांगितल्याप्रमाणे न लिहिणारा.
2. विद्याचोर : (१) शिकविताना विद्यार्थ्यांपासून काही भाग चोरून ठेवणारा, ते न शिकविणारा शिक्षक. (२) गुरुपासून विद्या चोरणारा, चोरून ज्ञान मिळविणारा.
3. चोरविद्या : गुप्त आणि गूढ विद्या अथवा कला.

**वाङमयचौर्याची गुप्तता**

वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य ही सार्वकालिक, सार्वजनिक सर्व संस्कृतींना कवेत घेणारी जागतिक समस्या आहे. समकालीन महाजालाच्या काळात ती सहज, सोपी आहेच; शिवाय या सुगमतेला जोडून चोरीचे एक वैशिष्ट्य म्हणजे चोरी होते पण त्याचवेळी ती अज्ञात राहू शकते, उघडकीस येऊ शकेल याची शाश्वती नसते. अर्थात हा दावा मर्यादित अर्थाने करता येतो. त्याची दोन स्पष्ट कारणे दिसतात.

पहिले असे की इंग्लिश (आंग्ल) ही जागतिक अथवा आंतरराष्ट्रीय ज्ञानभाषा आहे ( की नाही याविषयी कितीही मतमतांतरे असली तरी तिची अनिवार्यता नाकबूल करण्यात अर्थ नाही. ). इंग्लिश ही ज्ञानभाषा असल्यामुळे चोरी शोधणारी संगणकीय यंत्रणा इंग्लिश भाषेच्या माध्यमातून विकसित करणे सोपे झाले आहे. इंग्लिश भाषेच्या माध्यमातून संशोधनीय चोर-पोलिस खेळ रंगतो. पण चोर-चोरीशोधक संगणकीय यंत्रणेची मर्यादा अशी की प्रादेशिक भाषेतील या चोऱ्या लक्षात याव्यात, अशा

रितीच्या प्रादेशिक भाषेतील संगणकीय यंत्रणा अद्यापि उपलब्ध होऊ शकल्या नाहीत.

दुसरे कारण असे की, वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य शोधाची ही संगणकीय यंत्रणा आजतरी निसर्गविज्ञानांपुरती मर्यादित आहे, तिचा विस्तार अद्यापि सामाजिकविज्ञाने आणि मानस-नीति आणि मानव्यविद्यापर्यंत झालेला नाही. शिवाय निसर्गविज्ञानांच्या नियतकालिकात लेख, निबंध प्रसिद्धीस कधी मिळाला इत्यादीची नोंद करण्याची एक व्यावसायिक शिस्त आहे, तशी इतर विद्याशाखेत अद्यापि रुजलेली, रुळलेली नाही. काही सन्मान्य अपवाद असतीलही.[17]

**भाषांतराची समस्या**

Plagiarism चे मराठी भाषांतर नेमके काय व कसे करावे, हा संभ्रम दिसतो. उदाहरणार्थ Marxism, Empiricism, Rationalism, Scientism या आंग्ल संज्ञांचे भाषांतर मार्क्सवाद, अनुभववाद, प्रज्ञावाद, विज्ञानवाद असे केले जाते, तसे Plagiarism चे भाषांतर चौर्यवाद असे केले जात नाही. तसे करावे किंवा नाही, यावर स्वतंत्र चर्चा होऊ शकते. Plagiarism मधील ism या उपपदामुळे हा मार्क्सवाद, अनुभववाद इत्यादीसारखा 'वाद' (ism) म्हणजे विचारसरणी असे वाटले तरी Plagiarism ही विचारसरणी नाही. वर उल्लेखल्याप्रमाणे प्राचीन भारतात स्तेयशास्त्र रचण्याचा प्रयत्न झाला, पण डॉ. यशवंत रायकर यांच्या मते असे काही पुस्तक अस्तित्वात आलेच नाही. ते फक्त एक 'कवीकल्पना' होती[18] (आजच्या भाषेत 'चोर कल्पना' म्हणू यात काय !?!)

**Plagiarism *ची व्युत्पत्ति आणि इतिहास***

*इंग्लिश संज्ञा* "Plagiarism" ही लॅटीनमधील Plagiarius पासून बनते. Plagiarius म्हणजे पळविणारा किंवा चोर; तर plagium म्हणजे प्रत्यक्ष पळविणे, चोरीची कृती करणे. त्याचे मूळ plaga मध्ये आहे. Plaga चा अर्थ जाळे किंवा सापळा. एखाद्याला जाळ्यात पकडणे, एखाद्यासाठी सापळा रचणे ही गुप्तकृती आहे. ती कमालीच्या गुप्ततेने करावी लागते. म्हणून कोणतीही गुप्त कृती करणे, या अर्थाने plagiarius हे निष्पादित रूप बनले गेले आणि तसे करण्याची वहिवाट म्हणून "Plagiarism" ही संज्ञा आली असावी. Plaga चे मूळ इंडो-युरोपियन भाषेत आहे. त्यानंतर Plagiarius चा प्रवास इंग्लिशकडे सुरु झाला. १६०१ साली बेन जॉन्सन या नाटककार समीक्षकाने साहित्य चोराला उद्देशून plagiary हा शब्द उपयोगात आणला. इंग्लिश विचारविश्वात "Plagiarism" ही संज्ञा १६२० च्या दरम्यान स्वीकारण्यात आली. सम्युएल जॉन्सनने त्याच्या १७५५ साली प्रकाशित झालेल्या शब्दकोशात plagiary च्या "A thief in literature; one who steals the thoughts or writings of another", "The crime of literary theft" अशा व्याख्या दिल्या आहेत.

प्राचीन रोमन कवी मार्शल याने त्याच्या काव्याची चोरी त्याचा प्रतिस्पर्धी कवी फिडेन्टीअसने केल्याची तक्रार केली; त्यावेळी त्यासाठी त्याने जो शब्द वापरला त्याचे Plagiarius लॅटीन रूप आहे. ते भाषाविश्वात आणि विचारविश्वात एकदम चपखल बसले[19]. त्यावरून "Plagiarism" हा शब्द बनला, अशी नोंद जॅक लिंच या समीक्षकाने केल्याची दखल इंग्लिश विकिपीडियाने घेतली आहे.[20] प्रस्तुत विकिपीडियातील नोंदीसाठी जॅक लिंचच्या *The Perfectly Acceptable Practice of Literary Theft: Plagiarism, Copyright, and the Eighteenth Century, in Colonial Williamsburg*[21] *या लेखाचा आधार घेण्यात आला आहे.*

वाङमयचौर्य हा गुन्हा नाही

जॅक लिंचने अधोरेखित केलेली एक महत्वाची बाब म्हणजे 'वाङमयचौर्य हा आजही गुन्हा नाही' हा मुद्दा. यासंदर्भात तो अलेक्झांडर लिंडे या संशोधकाचे साधार मत या लेखात नमूद करतो. लिंडेच्या मते, इतरांकडून शब्द अथवा कल्पना ही कुणाची व्यक्तिगत मालमत्ता आहे आणि त्या मुक्तपणे इतरांकडून' उसन्या ' घेणे यात काही गैर आहे ,असे कुणाला वाटलेले नाही. अनेक शतके लेखक, चित्रकार, शिल्पकार आणि संगीत रचनाकार मंडळी इतरांना त्यांच्या मूळ कलेची नक्कल करण्यास, त्या मूळ कलेच्या प्रतिकृती बनविण्यास उद्युक्त करीत असत. घटना, प्रसंग, पात्रे आणि कल्पना-

संकल्पना हे अखेर' जनतेची मालमत्ता) "'*publica materies*," the common property (असते) म्हणजे ती सामान्य लोकांचे निरीक्षण करूनच निर्माण झालेली असतात, असे प्राचीन रोमन कवी आणि समीक्षक होरास युवा लेखकांना सांगतो आणि अशा लेखन घटकांना यथेच्छ लुटा, असा जणू आदेश देतो. त्यामुळे शेक्सपिअरच्या साऱ्या सदोतीस नाटकांत त्याच्या स्वतःच्या कल्पना अशा फारशा आढळत नाहीत, त्या साऱ्या त्याने इकडून तिकडून उचललेल्या आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे शेक्सपिअरच्या The Tempest या त्यातल्या त्यात शेक्सपिअरचे स्वतःच्या समजल्या जाणाऱ्या नाटकातही फ्रेंच लेखक आणि तत्त्ववेत्ता मॉन्तेनचे अनेक लांबलचक उतारे आढळतील.१८ व्या शतकात तर अनेक लेखक इतरांवरच (म्हणजे अस्सल लेखकांवर) अवलंबून होते. अस्सल लेखकांबाबत एक वेगळी गोष्ट म्हणजे ते लेखनाच्या आशयाद्रव्यासाठी निसर्गावर अवलंबून होते. हेलेखक, कवी बहुधा निसर्गकवी होते. निसर्गाची नक्कल करून अस्सल लेखन करू पाहणाऱ्या कवी, लेखकांबाबत अलेक्झांडर पोप हा कवी आणि धर्मगुरू म्हणतो, "निसर्ग आणि होमर एकच आहेत", "अभिजात साहित्यातून चोरण्याशिवाय आपल्यापुढे पर्यायच नाही ; कारण निसर्गाची नक्कल करणे म्हणजेच त्यांची (अभिजात साहित्य लेखची ) नक्कल करणे आहे".[22] (" We have no choice but to steal from the classics, said Pope, because "To copy Nature is to copy them.")

लिंच पुढे लेखनातील 'अस्सलता' (Originality) हा मुद्दा उपस्थित करतो. त्याचे निरीक्षण असे की लेखनातील 'अस्सलता 'हा मुद्दा आधुनिक अर्थाने 'आदर्श 'म्हणून प्रथम अठराव्या शतकात उपस्थित झाला. या बाबतीतील महत्वाचा मैलाचा दगड म्हणजे एडवर्ड यंग या कवीने वाङ्मयचोरीचा केलेला निषेध. १७५९ सालचे त्याचे वक्तव्य प्रसिद्ध आहे. त्याने नाविन्य, प्रतिभा यांचा पुरस्कार केला आणि नक्कल करण्यावर हल्लाबोल केला.. "अस्सलता ह्या थोर निर्मिती असतात, कारण त्या थोर लाभदायकता असतात; त्यांच्यामुळे अक्षरवाङ्मयविश्वाचे गणराज्य विस्तारत राहाते,,आणि ते या क्षेत्रात नेहमीच नवीन काही ना काही भर टाकत असतात. अनुकरणकर्ते मात्र एका प्रकारे जे आमच्याकडे आहे त्याच्या केवळ नकला देत असतात . चांगले लेखक हे अस्सल असतात, वाईट लेखक नक्कल करतात आणि नक्कल करणे ही हलकी ,नीच चोरी आहे" यंग अशा चोरीसाठी "sordid Theft" हा शब्दप्रयोग करतो.

लिंच अधोरेखित करतो की अशी विचार, कल्पना चोरीही काहीशी विचित्र चोरी आहे, कारण शब्द आणि कल्पना ह्याच मुळात विचित्र संपदा आहेत. 'मी समजा तुमचे पाकीट चोरले तर तुमचे पैसे जातात , पण तुमचे शब्द किंवा कल्पना चोरल्या तर ज्याची चोरी झाली आहे अशी कोणतीही भरीव गोष्ट तुमच्यापासून हिरावली गेलेली नसते. प्राचीन काळापासून लेखक कवी अशा चोरीची तक्रार करीत असले तरी अठराव्या शतकापर्यंत त्याची दाद घेतली जात नव्हती. जगातील पहिला" प्रताधिकार कायदा "(copyright act) लंडनमध्ये १० एप्रिल १७१० रोजी पारीत झाला आणि 'बौद्धिक संपदा हक्क 'ही गोष्ट प्रस्थापित झाली. या कायद्याचे नाव *दि स्टॅट्यूट ऑफ ॲन* (The Statute of Anne) असे होते.. पण लिंच लक्षात आणून देतो की हा नक्कल करण्यासंबंधीचा कायदा होता. वाङ्मयचोरीची व्याख्या, विस्तार किंवा ती थांबविणे इत्यादी हे या कायद्याचे थेट उद्दिष्ट नव्हते. एखाद्या वाङ्मयीन कृतीची अथवा त्याच्या एखाद्या भागाची नक्कल करण्यासंबंधी हा कायदा होता .म्हणजे बेकायदा नक्कल करून (आजच्या भाषेत झेरॉक्स करून) विकणे , वितरीत करणे संबंधी हा कायदा होता. हा कायदा एका अर्थाने बेकायदेशीर प्रकाशक आणि प्रकाशक मंडळीबाबत होता. 'लेखकाची परवानगी न घेता लेखकाच्या नावासह त्याच्या पुस्तकांची छपाई करून ती विकण्याला प्रतिबंध करणे' हाच मुद्दा या कायद्यामागे होता. त्यामुळे वाङ्मयचोरी हा गुन्हाच नव्हता.

वाङ्मयचोरी ही नैतिक बाब आहे तर प्रताधिकार ही कायदेशीर बाब आहे आणि वाङ्मयचोरीची प्रत्येक कृती काही कायद्याच्या विरुद्ध नसते .पण वास्तवात वाङ्मयचोर प्रताधिकारासह अनेक नैतिक गुन्हे करीत असतात . पत्रकारिता आणि शिक्षणक्षेत्रात वाङ्मयचोरी हा गंभीर गुन्हा मानला जातो. विद्यार्थी, शिक्षक-प्राध्यापक, संशोधक, मार्गदर्शक हे यात अग्रेसर असतात. तथापि आज एकविसाव्या शतकात अनेक कायदे करण्यात आले आहेत. पदानवती, आर्थिक लाभ अवनटी आणि प्रसंगी सक्तीची सेवामुक्ती अशा शिक्षा आहेतच. पण सामाजिक अपकीर्ती हा मोठा तोटा भोगावा लागतो .

**भाग तीन**

**मध्ययुगीन संस्कृत आणि मध्ययुगीन मराठीतील मधील `वाङ्मयचौर्य आणि श्रेयचौर्य : काही संदर्भ**

**संस्कृत वाङ्मयातील वाङ्मयचोरीची उत्पत्ती**

भारतीय संस्कृतिकोशात दिलेल्या माहितीनुसार वेद आणि तदनुषंगिक वैदिक आणि अवैदिक संस्कृत वाङ्मय हे जगातील सर्वात प्राचीन वाङ्मय म्हणून मानले जाते. भारतीय संस्कृतिकोशातील "चौर्यकर्म" या नोंदीनुसार[23] सामान्यतः मनुष्याच्या उत्पत्तीबरोबरच चोरीची उत्पत्ती झाली, असे म्हणावे लागते. जगातील सर्वात पहिली चोरी शंखासुराने केली. तीही सोन्यानाण्याची नव्हती तर *वाङ्मयाची* होती. याने केलेली चोरी म्हणजे *थेट वाङ्मयचौर्य* होते, म्हणजे उचलेगिरी, नक्कल इत्यादी न होता, थेट *वाङ्मयाचीच* चोरी झाली. त्याने ब्रह्मदेवाजवळ असलेले चार वेद चोरले! [24] वेद चोरून तो समुद्रात लपला. मग त्याला मारण्यासाठी विष्णूला मत्स्यावतार घ्यावा लागला. (पद्मपुराण सृष्टी.१३. ९०-९१, स्कंदपुराण ४.२.३३).[25]

अन्य कथेनुसार मधु आणि कैटभ नावाचे दोन शक्तिशाली राक्षसांनी ब्रह्माचे वेद पळवून पाताळात दडी मारली. ब्रह्माने भगवान विष्णुकडे गाऱ्हाणे नेले. मग विष्णूने हयग्रीव अवतार घेतला. गर्दन, मुख घोड्याचे आणि शरीर माणसाचे असा हा अवतार होता ! हयग्रीव पाताळात गेला. राक्षसांचा वध केला आणि वेद पुन्हा ब्रह्माला दिले. नंतरची कथा हिरण्याक्ष या दैत्याने पृथ्वी चोरण्याचा आहे. हिरण्याक्ष हा दैत्य पृथ्वी चोरून पाताळात जात असताना विष्णूने वराह अवतार घेऊन त्याला ठार मारले व पृथ्वीला वर आणले. (पद्मपुराण सृष्टी. ७५; भागवत पुराण ३.२८) इंद्राने हिरण्यकशिपुची गर्भवती राणी पळविली. तिचे नाव कयाधू. हिरण्यकशिपुला धडा शिकविण्यासाठी आणि त्याचा वंशनाश करण्यासाठी इंद्राने राणी कयाधूची चोरी केली. पण वाटेत नारद त्याला भेटला. त्याने हा गर्भ श्रीविष्णूचा भक्त बनून हिरण्यकश्यपूचा वध करेल किंवा त्याच्या वधाचे कारण होईल, असे इंद्रास सांगितले. हा गर्भ म्हणजे हिरण्यकश्यपूचा मुलगा म्हणजे प्रसिद्ध भक्त प्रल्हाद. या प्रल्हादाला नारदाकडून नारायण मंत्र आणि विष्णु भक्तीची दीक्षा मिळाली. अन्य कथेनुसार इंद्राला प्रल्हादाची माहिती होती, पण त्याला भक्तीची शिकवण देणे हे काही राणी कयाधू हिरण्यकशिपुच्या ताब्यात असेतोपर्यंत शक्य नव्हते, म्हणून तिलाच इंद्राने पळविले.

**श्रेयार्पणाची भारतीय रीति**

आपल्या ग्रंथाचे श्रेय इतरांना देण्याची जगात सर्वत्र आहे, तशी ती भारतातही आहेच. ग्रंथाची अर्पणपत्रिका हा भारतीय विशेष आहे. ग्रंथ सिद्धीसाठी प्रेरणा देणाऱ्या देव, देवता, देवतारूपी आद्यगुरु, मानवी गुरु, संत, महात्मे, समाज सुधारक तसेच ज्याची विचारसरणी मान्य आहे आणि ती पुढे न्यावयाची आहे असे विचारगुरु ; त्याचप्रमाणे मातापिता, बंधुभगिनी, इतर आप्त आणि आर्थिक सहायकर्ता, दाता यांना ग्रंथ अर्पण करण्याची रीति आहे. छपाईचा शोध लागल्यानंतर या अर्पणपत्रिका अधिक ठळकपणे पुढे आल्या. अर्थसहाय्य देणारी संस्था, धनिक दानशूर पालक व्यक्ती यांना ग्रंथ अर्पण करण्याची रीति १९ व २० व्या शतकात आढळते. अगदी अलिकडील काळात मित्र-मैत्रिणी, एखादी घटना, कृती, अगदी एखादे आठवणीतील गाव-शहर यांनाही पुस्तक अर्पण करण्यात आले.

या अर्पणपत्रिकांचे वैशिष्ट्य म्हणजे पुस्तक निर्मितीचे, त्यातील विचारांचे श्रेय दुसऱ्याला दिले जाते, ही नम्रता आहेच; पण त्याचवेळी ग्रंथातील चुकांचे उत्तरदायकत्व मात्र स्वतःकडे घेणे अशी अधिकाची विनम्रता आढळते. याचे सुप्रसिद्ध उदाहरणार्थ म्हणजे ज्ञानेश्वरी पहिला अध्याय.

**वारकरी संप्रदायातील श्रेयार्पण**

श्रेय अर्पण करण्याची आणखी एक रीति वारकरी संप्रदायात काहीवेळेस आढळते. विशेषतः संत तुकाराम महाराज आणि त्यांच्या शिष्या संत बहिणाबाई यांच्या गुरुशिष्य नात्यात हा नम्र भाव आढळतो. बहिणाबाईनी तुकाराम महाराजांचा एक सुप्रसिद्ध अभंग वाढविला आहे, असे दिसते. महाराष्ट्रातील भक्ति संप्रदायाची रचना कशी झाली, याचे वर्णन तुकारामांनी केले आहे. तो अभंग म्हणजे ,-

*संतकृपा झाली / इमारत फळा आली*
*ज्ञानदेवे रचिला पाया / उभारले देवालया / /*
*नामा तयाचा किंकर / तेणे केला हा विस्तार /*
*जनार्दन एकनाथ / खांब दिला भागवत / /*
*तुका झालासे कळस / भजन करा सावकाश / /*

हा मूळ अभंग पाच ओळीचा आहे. बहिणाबाईनी त्यात सहावी ओळ जोडली, -

*बहिणी म्हणे फडकती ध्वजा / निरुपणा केले ओजा / /*

या कृतीचे वर्णन *'बहिणाबाईनी केलेली अनुवादात्मक पुनर्रचना'* अशा शब्दात "संत बहेणाबाईंची गाथा" या पुस्तकाच्या लेखिका सौ. शालिनीबाई

जावडेकर यांनी केले आहे.[26] त्या पुढे असे दाखवून देतात की 'उदंड पाहिली उदंड ऐकली' सारख्या अभंगात 'तुका म्हणे' ऐवजी 'बहेणी म्हणे' असे बहेणाबाईंनी स्वतःचे नाम मुद्रांकित केले आहे. अर्थात "हे सर्व आपल्या सद्गुरूशी आत्यंतिक समरसता आणि तादात्म्याची खूण आहे." अशी पुस्ती भा. पं. बहिरट आणि प. ज्ञा. भालेराव हे दोघे लेखक जोडतात. हे दोघे पुढे दाखवून देतात की, 'बहिणाबाईनी काही अभंगात तर तुकोबांचे सर्व शब्द थोड्या फार घेऊन शेवटी "बहिणी म्हणे" म्हंटले आहे- उदा. "भक्ति प्रेम सुख नेणवे आणिका" या तुकोबांच्या अभंगात 'आणिका' ऐवजी "वैदिका" शब्द घातला आहे. खुद्द तुकोबांनी काही ठिकाणी नामदेवांची कडवी वापरली आहेत. वारकरी संप्रदायाचा हा अनुभव पाहाता असे म्हणता येते की, ही चोरीची किंवा श्रेयचोरीची कृती नाही तर उलट यात कोणता गैरप्रकार नसून आदराचीच भावना आहे.'[27]

**'मृच्छकटिक' चे श्रेय ?!**

भारतीयांना 'मृच्छकटिक' हे नाटक माहित असते. मृच्छकटिक (मातीची गाडी) या संस्कृत नाटकाचा कर्ता म्हणजे शूद्रक[28]. हा राजा होता. या नाटकाच्या लेखन, रचना यांच्या श्रेयाबाबत संभ्रम आणि गोंधळ आहेत. ('महाभारत' कर्ते महर्षी व्यास हे एकुलते ऋषी आहेत की अनेक ऋषी, आहेत या वादासारखा वाद शूद्रकाबाबतही आहेच. शूद्रक हा एकच राजा होता की अनेक राजे होते; की हे पदनाम होते, या विषयी निश्चिती नाही.)

'मृच्छकटिक' च्या वादांची संक्षिप्त दखल मराठी विश्वकोशातील '*शूद्रक*'[29] या नोंदीत घेण्यात आली आहे. ही नोंद सांगते की, "मुळात शूद्रकाच्या जीवनाविषयी निश्चित स्वरूपाची माहिती उपलब्ध नाही. त्याचा काळही निश्चितपणे सांगता येत नाही. *मृच्छकटिकाच्या* प्रस्तावनेत त्याच्याविषयी माहिती दिली आहे; परंतु ती प्रक्षिप्त असावी. इतिहासात-पुराणांत शूद्रक नावाचे राजे होऊन गेल्याचे आढळते. त्यावरून 'शूद्रक म्हणजे संवत स्थापणारा विक्रमादित्यच होय', असाही तर्क केला जातो. कालिदासाने मालविकाग्निमित्र नाटकाच्या प्रस्तावनेत सौमिल कवीचा[30] उल्लेख केला आहे. याचा अर्थ हा शूद्रक राजा कालिदासपूर्व असावा. कथासरित्सागरात उल्लेखिलेला शूद्रक हाच अभीरराजा शिवदत्त होय (इ. स. सु. २५०) असे प्रा. कोनो[31] चे मत आहे. आर्थर बेरिडेल कीथच्या मते शूद्रक हे दंतकथेतले नाव आहे. वामनकृत काव्यालंकारात, बाणभट्टकृत कादंबरीत आणि दण्डीकृत दशकुमारचरितात शूद्रकाचा उल्लेख आलेला आहे."

नोंदीत पुढे म्हंटले आहे की "राजशेखरच्या मते शूद्रक राजाच्या पदरी असलेल्या रामिल व सौमिल या दोन कवींनी एक संयुक्त काव्य केले असावे; म्हणजे मृच्छकटिकाची रचना केली असावी आणि कवी-कर्ता म्हणून शूद्रकाचे नाव घातले असावे, असाही निष्कर्ष काढला जातो. मृच्छकटिक हे नाटक शूद्रकाचेच आहे किंवा काय याबद्दलही विद्वानांत मतभेद आढळतात."

"भासाच्या नावावर असलेल्या 'दरिद्रचारुदत्त' (चारुदत्त) व 'मृच्छकटिक' या नाटकांत लक्षणीय साम्य आढळते. मृच्छकटिक हे भासाचे किंवा अन्य कवीचे असावे आणि त्याचा संक्षेप 'दरिद्रचारुदत्त' या नावाने केला असावा किंवा दरिद्रचारुदत्त या अपूर्ण नाटकास जोड देऊन मृच्छकटिक हे नाटक अन्य कवीने रचले असावे, असाही तर्क केला जातो. मृच्छकटिक आणि दशकुमारचरित यांच्या भाषेत व आशयात बरेच साम्य असल्याने दंडी हाच या नाटकाचा कर्ता असावा असेही एक मत आहे."

या नोंदीचे निरीक्षण करता असे म्हणता येईल की, इतक्या प्राचीन काळी वाङमयचौर्य आणि श्रेयचौर्य या संकल्पना प्रचलित नसाव्यात. (अर्थात एखाद्या उदाहरणावरून असा व्यापक निष्कर्ष काढणे हे जोखमीचे आहे, हे विसरता कामा नये.) उलट एकाच नावाचे अनेक लेखक असणे, त्यांचे घराणे असणे किंवा अनेकांनी लेखन करून मूळ लेखकाच्या नावे ते देणे, असे प्रकार घडत असत. या घटनेकडे दोन रीतींनी पाहाता येईल. एकतर, हा वाङमय प्रक्षिप्ततेचा प्रकार मानता येईल आणि दुसरे म्हणजे असे लेखन, नव्या संकल्पना अथवा नवे भाष्य, विवरण आपले न मानता ज्यास गुरु मानले आहे, त्यास किंवा मूळपुरुषास अर्पण करणे हा कृतज्ञतेचा भाग मानावा लागेल.

दर्शन साहित्य, उपनिषदे, महाकाव्ये, गीता, विविध स्मृतिग्रंथ व श्रुतिग्रंथ इत्यादी संस्कृत पाली, अर्धमागधी, प्राकृत इत्यादी भाषेतील वाङमय असे प्रक्षिप्त वाङमय असू शकते. पण याचवेळेस हे लक्षात घेतले पाहिजे की प्रक्षिप्तेत दोन हेतू आणि दोन प्रकार आहेत. एक चांगले वाङमय समाविष्ट करणे आणि दुसरे वाईट वाङमय घुसडणे. पहिले विधायक मानू आणि

दुसरे विघातक. दोन्ही कृती स्वरूपाने रचनात्मकच आहेत. पण त्यांचे हेतू वेगवेगळे आहेत. विधायकतेत समर्पण, विनम्रता, 'इदम् न मम्' भावाची निष्काम वृत्ती आहे. तर विघातकतेतही हीच 'इदम् न मम्' ची वृत्ती आढळेल पण दुष्ट हेतू असतो, मूळ लेखकाची अपकीर्ती करणे, हाच मुख्य हेतू असतो.

**श्रेयार्पण : श्रेयनामावलीची भारतीय परंपरा**

नम्रतेच्या भूमिकेतून आपले काम पूर्वसुरीना अर्पण करण्याच्या या रीतीची दखल नव्याने आधुनिक चर्चाविश्वात घेतली जात आहे.[32] असा एक ठळक उल्लेख एरिक एम. गुरेवीच् (Eric M Gurevitch)[33] या संशोधकाने त्याच्या एका लेखात[34] सविस्तरपणे केला आहे. संस्कृत साहित्यात बौद्धीक सातत्य दाखवण्याच्या दृष्टीने प्रभावांचे श्रेय नमूद करण्याची परंपरा होती, याकडे तो लक्ष वेधतो.

कालिदासाने लेखन करताना आपल्या पूर्वीच्या कवींचा अंशतः केलेला उल्लेख[35], 'कादंबरी' कार बाणाने दिलेली स्वतःच्या लेखनावरील प्रभावांची श्रेयनामावली यांची नोंद घेऊन गुरेवीच त्याची काही उदाहरणे देतो. हे संबंधित श्लोक मला मराठी विकिपीडियावर[36] आढळले. तेथे त्यांचा काव्यानुवाद श्री. निरंजन भाटे यांनी केलेला आहे आणि गद्यानुवाद श्री. अरविंद कोल्हटकर यांनी केला आहे. पण त्यांची यथार्थ भाषांतरे मात्र तेथे नव्हती. ती भाषांतरे मी डॉ. अनिरुद्ध मंडलिक यांच्याकडून करून घेतली आहेत. हे श्लोक आणि संबधित कवी पुढीलप्रमाणे :

**अ) सोमदेव सुरी** [37]

**मूळ श्लोक :**

कृत्वा कृतीः पूर्वकृताः पुरस्तात्प्रादरं ताः पुनरीक्षमाणः।
तथैव जल्पेदथ यो ऽन्यथा वा स काव्यचोरो ऽस्तु स पातकी च॥

**भाषांतर :**

*दुसऱ्याने केलेल्या पूर्वीच्या कलाकृती स्वःताच्या म्हणून सांगणे, त्यांचे परीक्षणही इतरांच्यासमोर करणे आणि "हे आपलेच आहे" असे जो कथन करतो; असा हा कवी काव्यचोर आणि पातकी आहे, असे समजावे.*

**काव्यानुवाद :**

उपयोगिता काव्य दुसऱ्याचे अपुल्या कवनामध्ये, करा प्रस्तुत परीक्षणा त्यांच्या समोर।
आणि करावे श्रेयनाम संबोधन, अन्यथा जाणावे असे काव्यचोर आणि पातकी घोर॥

**गद्यानुवाद :**

जुन्या कृति पुढे ठेऊन त्या जशाच्या तशा वा बदलून तसेच बरळेल (लिहील ) तो पातकी आणि काव्य चोर आहे.

**ब) पंडीत बिल्हण** [38]

**मूळ श्लोक :**

साहित्यपाथोनिधिमन्थनोत्थं काव्यामृतं रक्षत हे कवीन्द्राः ।
यदस्य दैत्या इव लुण्ठनाय काव्यार्थचौराः प्रगुणीभवन्ति ।।

**भाषांतर :**

*हे कवी श्रेष्ठांनो, साहित्यसागराचे मंथन केल्यावर जे काव्यामृत उत्पन्न होईल, त्याचे तुम्ही रक्षण करा. कारण, दैत्यासामान असणारे काव्यचोर; ते काव्य चोरण्यास तत्पर आहेत.*

**काव्यानुवाद :**

*साहित्यनिधीचे करीता मंथन, उसळे काव्यामृत जे, रक्षावे हे कवीश्वर।*
*कारणे काव्यचोर बैसले दैत्याप्रमाणे ते चोरण्या तत्पर॥*

**गद्यानुवाद :**

हे कवीन्द्रांनो, साहित्याच्या मार्गातील ठेव्याचे मन्थन करून काढलेल्या काव्यामृताचे रक्षण करा .कारण दैत्यांप्रमाणे त्यांच्यावर डाका घालायला टपलेले चोर वाढत आहेत.

**क) सारंगधर** [39]

अन्यवर्णपरावृत्त्या बन्धचिह्ननिगूहनै ।
अनाख्यातः सता मध्ये कविश्चौरो विभाव्यते ।।

**भाषांतर :**

*संदर्भ न देताच जे दुसऱ्याचे शब्द वापरतात, आणि त्याचा उल्लेखही करीत नाहीत; आणि सज्जनांमध्येही न ओळखला जाणारा असा कवी 'चोर' म्हणून गणला जातो.*

**काव्यानुवाद :**

परशब्द उचलती जे, संदर्भाच्या खुणेविना।

न ही वदती श्रेयनाम, ऐशा कवींना चोर जाणा॥

**गद्यानुवाद :**

दुसऱ्याच्या लेखनाची आवृत्ति करून आणि त्याच्या खुणा लपवून सज्जनांच्यामध्ये न ओळखला जाता वावरणारा काव्यचोर धन्य होय.

या संदर्भात शोधाशोध करताना 'मिसळपाव' या संकेतस्थळावर आणखी काही बाबी आढळल्या. त्यात श्रेयार्पण विकत घेण्याची एक घटनेची नोंद आढळते. इतरांनी लिहिलेले पसंत पडले आणि ते आपल्या नावावर असावे, अशी इच्छा व्यक्त होणे; तथापि संबधित कवीने, लेखकाने ते नम्रपणे नाकारणे, त्या नकाराची यथार्थ कारणे देणे, असे उल्लेख त्यात आहेत.

**यादवकालीन उल्लेख**

हा प्रसंग महानुभाव पंथाशी संबंधित आहे. महानुभाव पंथाचा "गद्यपद्य स्मृतिस्थळ"[40] हा एक महत्वाचा ग्रंथ असून त्यात पंथाशी संबधित अनेक घटनांची नोंद केलेली आहे. या ग्रंथात महानुभावी पंडित नरेंद्र यांच्या "रुक्मिणीस्वयंवर" या ग्रंथाच्या संदर्भाने एक प्रसंग घडला.[41] नरेंद्र पण्डिताने 'रुक्मिणीस्वयंवर' हा ग्रंथ रचला. तो देवगिरीचा राजा रामदेवरायच्या समोर सादर केला. इतक्या उच्च दर्ज्याचे व नितांत सुंदर काव्य ऐकून " 'रुक्मिणीस्वयंवर' हे काव्य आपल्या नावावर असावे", अशी अभिलाषा राजा रामदेवराय यांच्या उत्पन्न झाली. त्याबदल्यात प्रत्येक ओवीसाठी त्याने एक सुवर्णमुद्रा आणि त्याच्या चौपट चांदीचे नाणे देऊ, असे नरेंद्र पंडितास सांगितले. पण "इतर कवीलोक मला बोल लावतील" असे सांगून नरेंद्राने त्यास नम्रपणे नकार दिला ( आणि असे सांगतात की या एकूणच प्रसंगांमुळे व्यथित होऊन देवगिरीच्या राज्यदरबारचा त्याग करुन नरेंद्र पंडित महानुभव पंथात सामील झाला.) या प्रसंगाचे वर्णन[42] असे :

*"नरींद्रबासां भेटि: अनुसरणः नरेंद्र कवि: साळ कवि : नृसिंह कवि : हे तिघे भाऊ : नृसिंह कविन नलोपाख्यान केलें : साल कविन रामायण केलें : तें आपुलाले रामदेवरायापुढां म्हणितलें: तेथ नरेंद्र कवि बैसले होते : तयांसि भटोबासांपासौनि श्रवण होतें : अवघें आईकौनि म्हणितलें : यैसा द्वारकेचा रामहाट्ट वर्णितेती तरि तुमचेया पापा पुरश्चरण होतें : यैसे रायांदेखतां निभर्षिले: मग तेही म्हणितलें: तुम्हीं एक कवीत्व करा: मां तुमचि युक्ति पाहों: मग नरेंद्रबासीं तेणें सळें अठरासते रुक्मिणीसैंवर ग्रंथु केला:.... : वाचिता वाचिता ये वोवीपासी आले : ||देवाचेया दादुलेपनाचा उबारा: न साहावेचि सातांही सागरा : भेण वोसरोनि राजभरा : दीधली द्वारावती ||१||*

*यावरि रायें म्हणितले : या ग्रंथाचा अभंगु मज देयावा : म्यां जेतुकीया वोवीया तेतुके सोनटके अन चौथरीया आसु वोवाळणि घालीन : नरेंद्रबासीं म्हणितले : ना राजे हो आमुचेया कवीकुळा बोलु लागैल : मग त्याचे गर्व हरले : रायासी थोर चमत्कारु जाला : ........*

*प्रस्तुत संदर्भातील ओळ अशी :*

*"देवाचेया दादुलेपनाचा उबारा: न साहावेचि सातांही सागरा : भेण वोसरोनि राजभरा : दीधली द्वारावती"*

*तिचा अर्थ : "देवाचे म्हणजे श्रीकृष्णाच्या पराक्रमाचे तेज सात सागरही सहन करू शकले नाही. त्यांनी श्रीकृष्णाला घाबरून माघार घेतली आणि द्वारका दिली."* [43]

*ही ओळ वाचताच राजा रामदेवराय प्रभावित झाला आणि त्याने ग्रंथ आपल्या नावावर करण्याची ऑफर दिली.* प्रत्येक ओवीसाठी एक सुवर्णमुद्रा आणि चौपट चांदीचे नाणे अशी ती ऑफर होती.

**श्रेय चोरी : कालिदासाची हत्या**

चोरी आणि हत्या यांचा घनिष्ठ संबंध आहे. यात आज विसाव्या-एकविसाव्या शतकात ही फारशी नवलाची घटना नाही. चोर प्रसंगी हत्या करण्यास मागेपुढे पाहात नाहीत, हे खरे असले तरी श्रेयचोरी वाङ्मयचोरी या क्षेत्रात असे घडू नये, असे वाटणे स्वाभाविक आहे. पण इथेही चोरी इतक्या टोकाला जाते की त्यातून हत्याही घडू शकते, हे कालिदासाच्या जीवनावरून लक्षात येते. महाकवि कालिदासाची हत्या अशीच घडली, अशी कथा आहे.[44]

कालिदासाच्या अनेक चरितकथांमधील[45] त्याच्या 'कुमारदास वृत्त' या कथेत मृत्यूची एक कथा आहे.[46] कालिदास हा कुमारदास या राजाचा मित्र आणि दरबारी कवी होता. एकदा कुमारदासाच्या राजसभेत एका पंडिताने एक श्लोकार्ध दिला. तो श्लोक पूर्ण करणे आणि तो पूर्ण केल्यानंतर जो प्रश्न निर्माण होतो त्याचे उत्तर देणे, असे या आव्हानाचे स्वरूप होते. श्लोक पूर्ण करणे आणि समस्येचे उत्तर देणे यासाठी राजाने एक हजार सुवर्णनाणी देण्याचे जाहीर केले.

श्लोकार्धाची ओळ अशी होती :

*"कमले कमलोत्पत्ति: श्रूयते न तु दृश्यते"*

-- म्हणजे कमळात कमळ उत्पन्न होते, असे ऐकतो पण ते कोठेही दृष्टीस कसे पडत नाही?"

हा श्लोकाचा उत्तरार्ध होता. त्याचा पूर्वार्ध रचावयाचा होता.

कालिदास राजसभेत या प्रसंगी उपस्थित नव्हता. तथापि तो ज्या गणिकेच्या प्रेमात होता तिला राजसभेतील प्रस्तुतचा वृत्तांत माहीत झाला. तिने तो रात्री कालिदासाला कथन केला. त्याक्षणी कालिदास उत्तरला :

*"बाले ! तव मुखाम्भोजे कथमिन्दीवरद्वयम्"*

-- म्हणजे " हे बाले तुझ्या मुखरूपी कमळावर (नेत्ररुपी) ही दोन कमळे कशी ?

श्लोक पूर्ण झाला. तो असा[47] :

*" बाले ! तव मुखाम्भोजे कथमिन्दीवरद्वयम्*

*कमले कमलोत्पत्तिः श्रूयते न तु दृश्यते "*

पुरस्काराच्या लोभाने त्या गणिकेने रात्री कालिदासावर विषप्रयोग करून त्याची हत्या केली आणि बक्षीस मिळविले.

कालिदासाच्या या प्रसंगा बाबत अन्य एक कथा अशी :

राजा कुमारदास हा श्रीलंकेचा राजा होता. त्याने एका वेश्यागृहात या समस्येचा उत्तरार्ध लिहिला. तेथे कालिदास पोहोचला. त्याने तो पूर्ण केला. तो कालिदास ज्या वेश्येच्या प्रेमात होता, तिला त्याने कथन केला. तिने तो मुखोद्गत करून तिने कालिदासाची हत्या केली. नंतर राजाला कथन केला आणि पुरस्कार मिळविला. राजाला हे वृत्त सविस्तर कळताच तो भयानक संतापला. इतका की तो स्वतःच कालिदासाच्या चितेत गेला आणि स्वतःला कालिदासासह जाळून घेऊन आत्महत्या केली.[48]

**निष्कर्ष :**

वाङ्मयचौर्य आणि श्रेयचौर्य ही प्राचीन समस्या आहे. लिखित भाषा अस्तित्वात आल्यानंतर श्रेयाच्या अभिलाषेने अशी चोरी करण्याची इच्छा निर्माण होते. आधुनिक काळात या बाबी गंभीर मानल्या गेल्या आहेत; परिणामी प्रताधिकार, बौद्धिक संपदा हक्क इत्यादी कायदेशीर तरतुदी आणि अनुषंगिक दंडात्मक कारवाई इत्यादी गोष्टी पुढे आल्या आहेत. विद्यमान काळाच्या संदर्भात या साऱ्या नव्या बदलाची नोंद घेणे अनिवार्य आहेच, शिवाय श्रेय ही नैतिक हक्काशी निगडीत आहे त्यामुळे तो हक्क बजावण्याचा प्रत्येक लेखक, विचारवंत, कवी इत्यादींचा अबाधित राहिला पाहिजे.

वाङ्मयचौर्य आणि श्रेयचौर्य होण्याचे अनेकदा कारण असे घडते की संबंधित लेखक, कवी इत्यादींना संदर्भासहित लेखन कसे करावे, इतरांचे श्रेय त्यांना देणे हे नैतिक जबाबदारी आहे, याची जाणीव नसते. म्हणजे प्रशिक्षण, नैतिक जाणिवांचा अभाव या कारणामुळे हे आधुनिक गुन्हे घडतात. ते टाळावयाचे असेल तर अशा प्रकारच्या प्रशिक्षणाची आणि प्रशिक्षकांची नितांत गरज आहे. ही गरज केवळ उच्चशिक्षण क्षेत्रातील संशोधन कार्यापुरते सीमित नसून व्यापक सामाजिक लेखनापर्यंत त्याच पट विस्तारीत आहे. त्यामुळे तिथेपर्यंत हे प्रशिक्षण झिरपले पाहिजे आणि संशोधनविषयक नैतिक जाणिवांचा विकास झाला पाहिजे.

सर्जनशीलता हे शेत आहे, असा विचार केला तर,
प्रताधिकार (कॉपीराईट ) हे कुंपण आहे

जॉन ओस्वाल्ड [49]

---

[1] मूळ उद्धरण : *"Copy from one, it's plagiarism; copy from two, it's research*" Wilson Mizner : http://philosiblog.com/2011/09/20/copy-from-one-it%E2%80%99s-plagiarism-copy-from-two-it%E2%80%99s-research/ भाषांतर लेखकाचे.

[2] **Police** : https://en.wikipedia.org/wiki/**Police**, acceesed on April ,6, 2016

[3] **Police** : https://en.wikipedia.org/wiki/**Police**, acceesed on April ,6, 2016

[4] भारतीय संस्कृतिकोश, खंड ३, पान ४७८, "चौर्यकर्म", संपादक : पंडित महादेवशास्त्री जोशी, सहसंपादक : तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, श्री. व. ग. सहस्त्रबुद्धे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, ४१०, शनिवार पेठ, पुणे ३०, मूल्य रु. ६००/-, आवृत्ती २००९, मुद्रक : ॲलर्ट डी. टी. प्रिंटर्स, ओमकार १०/३, वडगाव (खुर्द), सिंहगड रोड, पुणे ३०; संगमनेर महाविद्यालय संगमनेर, ग्रंथालय क्र. 21251544, k/जोशी/51544.

[5] मराठी व्युत्पत्ति कोश, पान ३९९, संपादक: कृ. पां. कुलकर्णी, शुभदा सारस्वत प्रकाशन, पुरवणी संपादक कै . श्रीपाद जोशी, पुणे, २००४. पण पुढे नोंदीत असे लिहिले आहे की "त्यांना ही व्युत्पत्ति मान्य नाही". "त्यांच्या" मते, ठक्कर, ठाकर, ठाकरले या शब्दांशी तस्कर शब्द चा संबंध असावा. इथे 'त्यांना' व 'त्यांच्या' याचा अर्थ निश्चित नाही. इथे 'कुलकर्णी' अभिप्रेत आहेत की पुरवणी संपादक 'जोशी' हे समजत नाही.

[6] SANSKRIT-MARATHI DICTIONARY, Page 471, V.S Apte, , Sri Satgguru Publications, A Division of Indian Books Centre 40/5, Shakti Nagar, Delhi 110007, Reprint edition 2007, ISBN 81-7030-190-4, Rs. 600/-, .

[7] 'महाराष्ट्रीय शब्दकोश', विभाग तिसरा पान १२३० ते १२३४, संपादक : यशवंत रामकृष्ण दाते (बी.ए. एल.एल. बी.) व चिंतामण गणेश कर्वे (बी.ए.), मुद्रक व प्रकाशक : वरदा बुक्स, ह. अ. भावे, ३९७/१, सेनापती बापट रोड, पुणे १६ मुद्रण :स्मिता प्रिंटर्स, १०१९, सदशिव पेठ, पुणे २०, नवी आवृत्ती –एप्रिल २९८८, संगमनेर महाविद्यालय संगमनेर, ग्रंथालय क्र. 21245698, P155: 4k/ दाते य/45698.

[8] महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग तेरावा, पान २०६, श्री. व्यं. केतकर, मुद्रक : श्री. व्यं. केतकर, ज्ञानकोश छापखाना, ८४१, सदाशिव पेठ, पुणे; प्रकाशक : महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ, लिमिटेड, नागपूर तर्फे श्री. व्यं. केतकर, आवृत्ती १९२५,.

[9] गीर्वाणलघुकोश, कै. जनार्दन विनायक ओक (एम. ए.), पान ५२४, सुधारलेली चवथी आवृत्ती, ०१ ऑगस्ट २००२, मूल्य: रु. २००/-, प्रकाशक : आनंद लाटकर, कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि. पुणे ३०

[10] गीर्वाणलघुकोश, कै. जनार्दन विनायक ओक (एम. ए.), पान ५२४, सुधारलेली चवथी आवृत्ती, ०१ ऑगस्ट २००२, मूल्य: रु. २००/-, प्रकाशक : आनंद लाटकर, कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि. पुणे ३०

[11] भारतीय संस्कृतिकोश, खंड ३, पान ४७८, "चौर्यकर्म", संपादक : पंडीत महादेवशास्त्री जोशी, सहसंपादक : तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, श्री. व. ग. सहस्त्रबुद्धे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, ४१०, शनिवार पेठ, पुणे ३०, मूल्य रु. ६००/- आवृत्ती २००९, मुद्रक : ॲलर्ट डी. टी. प्रिंटर्स, ओमकार १०/३, वडगाव (खुर्द), सिंहगड रोड, पुणे ३०, प्रत : संगमनेर महाविद्यालय संगमनेर ग्रंथालय क्र. 21251544, k/जोशी/51544.

[12] सुलभ विश्वकोश, भाग दोन, पान ८१२-१३, संपादक : यशवंत रामकृष्ण दाते (बी.ए. एल.एल. बी.) व चिंतामण गणेश कर्वे (बी.ए.), प्रकाशक : यशवंत गोपाळ जोशी, प्रसाद प्रकाशन, ६२३/१५ सदाशिव पेठ, पुणे २, मुद्रक : श्रीपाद रघुनाथ राजगुरू, राजुगुर प्रेस, ४०५, नारायण पेठ, पुणे, ०१ जुलै १९४९, संगमनेर महाविद्यालय संगमनेर ग्रंथालय क्र. 2124250, K2/ दाते /42450.

[13] मराठी विश्वकोश, खंड ६, "चोरी", कवळेकर सुशील, https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand6/index.php/23-2015-01-28-09-50-16/11035-2011-12-31-07-43-08

[14] *सार्थ मनुस्मृती*, संपूर्ण मराठी भाषांतर, पान २२७, वेदशास्त्रसंपन्न विष्णुशास्त्री वामन बापट, प्रकाशक : राजेश रमेश रघुवंशी, राजेश प्रकाशन, २६, गिरीजा सोसायटी, एम. आय. ती. रोड, पुणे ३८; मुद्रक : श्री. गो. म. जोशी, ज्ञानविलास मुद्रणालय, २७ बुधवार पेठ, पुणे २, किंमत रु. २००, संगमनेर महाविद्यालय संगमनेर ग्रंथालय क्र. Q2:4x1,1/ बापट/46260.

15 मराठी विश्वकोश, खंड १५, इनामदार, श्री. दे. https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand15/index.php/component/content/article?id=11574

[16] 'महाराष्ट्रीय शब्दकोश', विभाग तिसरा पान १२३० ते १२३४, संपादक : यशवंत रामकृष्ण दाते (बी.ए. एल.एल. बी.) व चिंतामण गणेश कर्वे (बी.ए.), मुद्रक व प्रकाशक : वरदा बुक्स, ह. अ. भावे, ३९७/१, सेनापती बापट रोड, पुणे १६ मुद्रण :स्मिता प्रिंटर्स, १०१९, सदशिव पेठ, पुणे २०, नवी आवृत्ती –एप्रिल २९८८, संगमनेर महाविद्यालय संगमनेर, ग्रंथालय क्र. 21245698, P155: 4k/ दाते य/45698.

[17] टीप क्रमांक ०२ पाहा.

[18] भारतीय स्तेयशास्त्र, डॉ. यशवंत रायकर, http://www.lokprabha.com/20091120/sanskriti01.htm, acessed on March 16, 2016

[19] Plagiarism: Grounds for Dismissal, http://www.esm.rochester.edu/registrar/files/2014/05/plagiarism_examples.pdf

[20] Plagiarism, https://en.wikipedia.org/wiki/Plagiarism, acessed on March 16, 2016

[21]Jack Lynch ,The Perfectly Acceptable Practice of Literary Theft: Plagiarism, Copyright, and the Eighteenth Century , http://www.writing-world.com/rights/lynch.shtml, acessed on March 16, 2016

[22] Jack Lynch ,The Perfectly Acceptable Practice of Literary Theft: Plagiarism, Copyright, and the Eighteenth Century, http://www.writing-world.com/rights/lynch.shtml acessed on March 16, 2016

[23] भारतीय संस्कृतिकोश, खंड ३, पान ४७८, "चौर्यकर्म" संपादक : पंडीत महादेवशास्त्री जोशी, सहसंपादक : तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, श्री. व. ग. सहस्त्रबुद्धे, प्रकाशक : भारतीय संस्कृतिकोश मंडळ, ४१०, शनिवार पेठ, पुणे ३०, मूल्य रु. ६००/- आवृत्ती २००९, मुद्रक : अॅलर्ट डी. टी. प्रिंटर्स, ओमकार १०/३, वडगाव (खुर्द), सिंहगड रोड, पुणे ३०, प्रत : संगमनेर महाविद्यालय संगमनेर, ग्रंथालय क्र. 21251544, k/जोशी/51544.

[24] टीप क्रमांक ०३ पाहा.

[25] टीप क्रमांक ०४ पाहा.

[26] भा. पं. (भालचंद्र पंढरीनाथ) बहिरट आणि प. ज्ञा. (पद्मनाभ ज्ञानेश्वर) भालेराव, "वारकरी संप्रदाय : उदय व विकास", *वारकरी संप्रदायाचा उदय आणि विकास*, दुसरी आवृत्ती, जुलै १९८८, प्रकाशक : स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या' ,३८१ क, शनिवार पेठ, पुणे ३०, मूल्य रु. १८०/-, पान ०८, लेखकाची खासगी प्रत.

[27] भा. पं. (भालचंद्र पंढरीनाथ) बहिरट आणि प. ज्ञा. (पद्मनाभ ज्ञानेश्वर) भालेराव, "वारकरी संप्रदाय : उदय व विकास", *वारकरी संप्रदायाचा उदय आणि विकास*, दुसरी आवृत्ती, जुलै १९८८, प्रकाशक : स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या' ,३८१ क, शनिवार पेठ, पुणे ३०, मूल्य रु. १८०/-, पान ०७, लेखकाची खासगी प्रत.

28 मराठी विश्वकोश, खंड १७, "शूद्रक" पोळ, मनीषा, https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand17/index.php/component/content/article?id=10630

29 मराठी विश्वकोश, खंड १७, "शूद्रक" पोळ, मनीषा, https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand17/index.php/component/content/article?id=10630

[30] टीप क्रमांक ५ पाहा.

[31] टीप क्रमांक ६ पाहा.

[32] "संदर्भ" : मराठी विकिपेडीया, श्रेयनामावलीची भारतीय परंपरा https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B8%E0%A4%82%E0%A4%A6%E0%A4%B0%E0%A5%8D%E0%A4%AD#cite_note-6

33 टीप क्रमांक ०७ पाहा.

[34] Eric M Gurevitch, Read the Sanskrit texts: Why both Rajiv Malhotra and his critics are wrong about plagiarism,http://scroll.in/article//743119rajiv-malhotra-and-his-critics-are-both-wrong-sanskrit-texts-considered-plagiarism-a-crime, accessed on January, 13, 2016

[35] टीप क्रमांक ०८ पाहा.

36 श्रेयनामावलीची भारतीय परंपरा, https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B8%E0%A4%82%E0%A4%A6%E0%A4%B0%E0%A5%8D%E0%A4%AD?oldformat=true#cite_note-5, accessed on January, 13, 2016

[37] टीप क्रमांक ०९ पाहा.

[38] टीप क्रमांक १० पाहा.

[39] टीप क्रमांक ११ पाहा.

[40] टीप क्रमांक १२ पाहा.

[41] डॉ. सुहासिनी इर्लेकर, नरेंद्रकृत आद्य मराठी महाकाव्य, प्रकाशक : अरुण जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११,

धन्वंतरी सहकारी गृहरचना संस्था, पांडुरंग कॉलनी, एरंडवन, पुणे ४११ ०३८, प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २००९, मूल्य ३०० रुपये, पान ४०-४१ आणि पान ३४०-४१.

[42] 'स्मृतिस्थळ' पान ४७ , स्मृति क्र.११३, प्रकाशक : महानुभव आश्रम, सातारा, शताब्दी महोत्सव ५ व ६ मे, २०१२; संपादक : वा. ना. देशपांडे, डॉ. व. वि. पारखे, डॉ. प्रा. रमेश आवलगावकर.

[43] टीप क्रमांक १३ पाहा.

[44] नूलकर, वसंत कृष्ण, "महाकवि कालिदासकृत रघुवंश", कै. मनोहर यशवंत तथा बापूसाहेब जोशी स्मृतिग्रंथ माला, प्रसाद प्रकाशन, पुणे, पान २५, प्रथमावृत्ती ०३ जून २०१२ किंमत ६०० रुपये, प्रत : संगमनेर महाविद्यालय, संगमनेर, क्र. ५४४३३/१६/१२/१३.

[45] नूलकर, वसंत कृष्ण, *महाकवि कालिदासकृत रघुवंश* प्रस्तावना : "'महाकवि कालिदासाबद्दल थोडेसे" : कालिदासाच्या चार जन्मकथा : विद्योत्तमा वृत्त, नवरत्न वृत्त, भोज वृत्त आणि कुमारदास वृत्त.

[46] डॉ. रमाशंकर पाण्डेय, मालविकाग्निमित्रम् – संस्कृत-हिंदी व्याख्योपेतम्, चौखम्बा सुरभारती ग्रन्थमाला, चौखम्बा सुरभारती प्रकाशन, वाराणसी, पान ०२, मूल्य ७५ रुपये, संस्करण २०१०; प्रत : संगमनेर महाविद्यालय, संगमनेर, क्र. O15.1/ पाण्डेय/54475.

[47] डॉ. रमाशंकर पाण्डेय, मालविकाग्निमित्रम् – संस्कृत-हिंदी व्याख्योपेतम्, चौखम्बा सुरभारती ग्रन्थमाला, चौखम्बा सुरभारती प्रकाशन, वाराणसी, पान ०२, मूल्य ७५ रुपये, संस्करण २०१०; प्रत : संगमनेर महाविद्यालय, संगमनेर, क्र. O15.1/ पाण्डेय/54475.

[48] डॉ. रमाशंकर पाण्डेय, मालविकाग्निमित्रम् – संस्कृत-हिंदी व्याख्योपेतम्, चौखम्बा सुरभारती ग्रन्थमाला, चौखम्बा सुरभारती प्रकाशन, वाराणसी, पान ०२, मूल्य ७५ रुपये, संस्करण २०१०; प्रत : संगमनेर महाविद्यालय, संगमनेर, क्र. O15.1/ पाण्डेय/54475.

[49] विकिपीडिया : साईट नोटीस/इतर माहिती/सदस्य प्रताधिकार सजगता/6

https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B5%E0%A4%BF%E0%A4%95%E0%A4%BF%E0%A4%AA%E0%A5%80%E0%A4%A1%E0%A4%BF%E0%A4%AF%E0%A4%BE:%E0%A4%B8%E0%A4%BE%E0%A4%88%E0%A4%9F_%E0%A4%A8%E0%A5%8B%E0%A4%9F%E0%A5%80%E0%A4%B8/%E0%A4%87%E0%A4%A4%E0%A4%B0_%E0%A4%AE%E0%A4%BE%E0%A4%B9%E0%A4%BF%E0%A4%A4%E0%A5%80/%E0%A4%B8%E0%A4%A6%E0%A4%B8%E0%A5%8D%E0%A4%AF_%E0%A4%AA%E0%A5%8D%E0%A4%B0%E0%A4%A4%E0%A4%BE%E0%A4%A7%E0%A4%BF%E0%A4%95%E0%A4%BE%E0%A4%B0_%E0%A4%B8%E0%A4%9C%E0%A4%97%E0%A4%A4%E0%A4%BE/6

## Final 3 लेखकाच्या टीपा

1. मूल्यशास्त्र (axiology): मूल्यांचे स्वतंत्र अध्ययन आणि अध्यापन करणारी तत्त्वज्ञानातील शाखा.
2. आता, हा लेख वाचून एखाद्या अशा तऱ्हेच्या भांडवलशाही व्यवस्थापकांस येईल, आणि त्याने तशी गरज पूर्ण केली, म्हणजे शोध लावून बाजारपेठ काबीज केली तर त्याचे श्रेय (मानधन मिळाले तर आनंदच आहे !) मला दिले जाईल याची शाश्वती नाही. "या इथे चौर्यतळी" नक्कीच चौर्यकर्म होऊ शकेल, यात किमान संशय घेता येऊ शकतो. संगणकीय यंत्रणा तसेच नोंदीची संपादकीय यंत्रणा उपलब्ध नसण्यामागे त्याच्या ग्राहक वर्गाचा अभाव ही मुख्य समस्या आहे. अर्थात ज्याक्षणी अशा रितीच्या नोंदीच्या संपादकीय यंत्रणेस मोठी बाजारपेठ आहे आणि 'ग्राहकवर्ग कृत्रिमरित्या निर्माण करता येतो', याचे भान सातत्याने बाळगणाऱ्या भांडवलशाही व्यवस्थापकांना येईल, त्याक्षणी हा अवकाशही विक्रीवस्तुनी भरला आणि भारला जाईल.
3. आता, या चोरीचे स्वरूप समजू शकत नाही. म्हणजे 'वेद' नावाची पुस्तके, खंड असे काही त्याकाळी नव्हते. निर्मितीच्या प्राथमिक

कालखंडात आणि नंतरही दीर्घकाळ हे सारे वाङ्मय मौखिक स्वरुपात होते, गुरु-शिष्य परंपरेने ते प्रवाहित राहिले, ही वस्तुस्थिती आहे. ती गुरुमुखी गुरु-शिष्य परंपरा होती.

4. हे असे संदर्भ शोधणे, विशेषतः संस्कृत वाङ्मयातील- पुराणे, कथाकथने, महाभारत, रामायण इत्यादीचे संदर्भ शोधणे अवघड आहे. कारण त्याच्या विविध आवृत्त्या असतात. महाभारताची भांडारकर प्रत जशी प्रमाणभूत मानली जाते तशी प्रमाणभूत प्रत अशा संदर्भाची असू शकेल असे नाही. अशा नोंदीचा लेखक जे संदर्भ ग्रंथ वापरतो, ते उपलब्ध होणे अवघड असते. म्हणून नोंद लेखक जे संदर्भ देतो तेच प्रमाण मानावे लागतात.

5. हा उल्लेख एका प्रसंगातून कळतो. हा प्रसंग नाटकाच्या प्रस्तावानेपर संवादात असून तो कालिदासाने पारिपार्श्वक या पात्राच्या तोंडी घातला आहे. त्यातून त्याचे पूर्वसुरी कळतात. हा संवाद असा : *प्रथितयशसा भाससौमिल्लककवि पुत्रादीनां प्रबन्धानतिक्रम्य वर्तमानकवेः कलिदास्यस्य क्रियायां कथं बहुमानः* अर्थ : भास, सौमिल्लक आणि कविपुत्र सारख्या मोठमोठ्या प्रसिद्ध कविची नाटके सोडून आजकालच्या या नवशिक्या कवी कालिदासाच्या नाटकांना इतके महत्व का देत आहात ? संदर्भ: डॉ. रमाशंकर पाण्डेय, मालविकाग्निमित्रम् – संस्कृत- हिंदी व्याख्योपेतम्, चौखम्बा सुरभारती ग्रन्थमाला, चौखम्बा सुरभारती प्रकाशन, वाराणसी, पान ०४, प्रथम अंक, मूल्य ७५ रुपये, संस्करण २०१०; प्रत : संगमनेर महाविद्यालय, संगमनेर, क्र. O15.1/ पाण्डेय/54475. पुढे लेखक पाण्डेय यांनी सूचित केले आहे की " भासाची नाटके उपलब्ध आहेत, पण सौमिल्लक आणि कविपुत्र यांच्या रचना मिळणे अशक्य आहे !

6. प्रा. स्टेन कोनो कोण ? हे काही पुस्तके, इंटरनेट इत्यादीवर शोधण्याचा प्रयत्न केला; पण ते कोण हे मला सापडले नाही ! नावाचा उल्लेख मराठीत आहे, शिवाय स्पेलिंग नाही.

7. एरिक एम. गुरेवीच् (Eric M Gurevitch) न्यूयॉर्क सिटी, न्यूयॉर्क; येथे धर्म आणि संस्कृत या विषयाचे अध्यापक, भाषांतरकार आणि लेखक असून ते भारतात विशेष अभ्यासासाठी २०१४ दरम्यान म्हैसूर येथे वास्तव्यास होते. 'म्यूज इंडिया' आणि 'दी हिप्पोक्रीट रीडर', नियतकालिकात त्यांची संस्कृत काव्याची भाषांतरे आणि 'असिम्प्टोट जर्नल' आणि 'दी हिंदू' च्या 'बिझिनेस लाईन' स्तंभात इतर लेखन प्रसिद्ध झाले आहे.

http://www.museindia.com/authorprofile.asp?myr=2014&issid=56&id=2149

8. उदाहरणार्थ 'रघुवंश' या महाकाव्याच्या प्रथम सर्गाचा तिसरा श्लोक असा आहे: *मन्दः कवियशः प्रार्थी गमिव्याम्युपहास्यताम् । प्रांशुलभ्ये फ़ळे मोहात् उद्वाहुरिवे वामनः ।।*

अर्थ : मंद (बुद्धीचा) असूनही (एखाद्या मोठ्या) कवीचे (कवीप्रमाणे मला) यश मिळावे अशी इच्छा करणारा मी, (अगदी)अशा प्रकारे हास्यास्पद (उपहासाने हसू तुच्छ ठरला गेलेला असा) ठरणार आहे. की जसं उंच हात असलेल्यास (पुरुषास) मिळू शकेल, असे फळ जसे काही एखाद्या बुटक्या (वामन) पुरुषाने हात उंच करून मिळविण्याचा (विफल) प्रयत्न करावा. भाषांतर : वसंत कृष्ण नूलकर, 'महाकवि कालिदासकृत रघुवंश, कै. मनोहर यशवंत तथा बापूसाहेब जोशी स्मृतिग्रंथ माला, प्रसाद प्रकाशन, पुणे, पान ९१, प्रथमावृत्ती ०३ जून २०१२ किंमत ६०० रुपये, प्रत : संगमनेर महाविद्यालय, संगमनेर, क्र. ५४४३३/१६/१२/१३.

9. सोमदेव सुरि : इ.स .शतक १० वे पूर्वार्ध : हा एक दिगंबर पंथीय जैन कवी होता. तो देवसंघाचा आचार्य होता. नेमिदेव हा याचा गुरु. महेंद्रदेव हा धाकटा भाऊ होता. नेमिदेवाप्रमाणे सोमदेव सुरी हा मोठा तर्कशास्त्री होता. त्याचा प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे यशस्तिलकचंपू. या चंपूचे आठ भाग आहेत. त्यांना 'उच्छवास म्हणतात. यशस्तिलकचंपूचे एकूण आठ भाग आहेत. पहिल्या पाच 'उच्छवासात अवंतीचा राजा यशोधर याचे चरित्र वर्णिले आहे. शेवटच्या तीन 'उच्छवासात' जैनांच्या धर्मसिधान्ताचे विस्तृत विवेचन आहे. ते सोमदेव सुरीने गुणभद्राच्या उत्तरपुराणातील एका कथानकावरून हे चरित्र लिहिले. ते संस्कृत मध्ये आहे. जैन साहित्याप्रमाणे याचा जैनेतर साहित्यातही अधिकार होता. त्याने नीतिवाक्यामृत, युक्तिचिंतामणी, त्रिवर्गमहेंद्रमातलिसंज्ल्प, षण्णवतिप्रकरण व अध्यात्मतरंगिणी हे ग्रंथ लिहिले. नीतिवाक्यामृत हा ग्रंथ त्याच्या प्राचीन भारतीय धर्मशास्त्र, अर्थशास्त्र व नीतिशास्त्र यांच्या सखोल अध्ययनाचे फळ आहे. अरिकेसरिचा मुलगा बद्दिग याने सोमदेव सुरिला एक गाव इनाम दिल्याचा उल्लेख एका ताम्रपटावर आहे.

10. बिल्हण (इ.स. ११ वे शतक) काश्मिरी पंडित आणि महाकवी. जन्म: खोनमुख, प्रवरपुरानजीक काश्मीर. मृत्यू काल : उपलब्ध नाही. ब्राह्मण कौशिक गोत्र पिता : ज्येष्ठ कलश आणि नागदेवी घराणे अग्निहोत्री वडील व आजोबा वैदिक महापंडित. वडिलांनी पतंजलीच्या महाभाष्यावर टीका लिहिली. बिल्हणाने लहानपणीच वेद, व्याकरण व काव्यशास्त्र यांचे अध्ययन पूर्ण केले. तो काश्मीरमध्ये असतानाच त्याचे ग्रंथ ख्याती पावले होते. इ.स. १०६२-६५ दरम्यान त्याने देशाटन केले. पंजाब, मथुरा-वृंदावन, ते कनौज, प्रयाग, काशी, इत्यादी करीत तो बुंदेलखंड येथे डहाल प्रांताचा राजा कृष्णराज यांच्या दरबारात गेला. तेथे त्याने गंगाधरशास्त्री या पंडिताचा पराभव केला. तेथून त्याला गुजराथ येथे धारा नगरीत राजा भोजकडे जाण्याची इच्छा होती. तथापि राजाचा मृत्यू झाल्याने त्याने सोमनाथ येथे गेला. तेथून परतताना कर्नाटकात चालुक्याची राजधानी कल्याण येथे गेला. तेथे चालुक्य सम्राट विक्रमादित्य 'सहावा' याने त्याला एक हत्ती आणि नीलछत्र देऊन राजसभेत 'विद्यापती' हे पद दिले. जीवनाच्या अखेरपर्यंत बिल्हण विक्रमादित्याच्या आश्रयास राहिला. तेथे त्याने विक्रमांकदेवचरित हे महाकाव्य रचले. बिल्हण खरा विदग्ध कवी वाटतो. दीर्घ समास व अनुप्रास यांचा त्याने फारसा उपयोग केलेला नाही. वीररस प्रधान आहे पण शृंगार व करुण रसही आढळतात. त्याच्या रचनेत इंद्र व्रज्या आणि वंशस्थ ही दोन वृत्तेच आढळतात.

11. सारंगधर हा संस्कृत कवी होता. त्याचा काल अंदाजे १४ वे शतक असावा. त्याने 'पद्धती' हा औषधविषयक ग्रंथ लिहिला, असे म्हणतात. साकाम्बरी देशाच्या भूपती राजा हम्मिरा यांचा पणतू आणि राघव या राजाचा नातू असावा. म्हणजे राघवचा मुलगा दामोदर याचा सारंगधर हा मुलगा होता, अशी माहिती मिळते. संदर्भ : History of Sanskrit Literature, M. Krishnamachariar, Assisted by M. Srinivasachariar, page 386, Motilal Banarsidass Publishers, Delhi; ISBN: 81-208-0284-5, Price: Rs. 695/- प्रत : संगमनेर महाविद्यालय संगमनेर, ग्रंथालय क्र .21254365, 015v/Krishnam/54365

12. स्मृतिस्थळ : चक्रधरस्वामींचे उत्तराधिकारी नागदेवाचार्य यांच्या जीवनावरील ग्रंथ.

त्याची रचना इ.स.१३१२ दरम्यान झाली असावी. त्याची रचना म्हाइंभटाने केली. त्यात त्यात नागदेवाचार्य यांच्या आठवणी ग्रथित केल्या आहेत. त्यांना 'स्मृति' म्हणतात. त्या एकूण २६०आहेत. इसवीसन १२९० मध्ये लिहिल्या गेलेल्या ज्ञानेश्वरीच्या आधी म्हाइंभटाने चक्रधरस्वामींचं गद्य चरित्र लिहिले, ते 'लीळाचरित्र'. ' लीळाचरित्र' मधील चक्रधरस्वामींची वचने संग्रहित करून महानुभावांनी 'सूत्रपाठ'ची निर्मिती केली. 'सूत्रपाठ' हा या संप्रदायाचा मूलभूत पवित्र प्रमाणग्रंथ होय. म्हाइंभटाने स्वामींचे उत्तराधिकारी नागदेवाचार्य यांचंही चरित्र सिद्ध केलं. त्याचं नाव 'स्मृतिस्थळ'. 'स्मृतिस्थळ', 'रुक्मिणीस्वयंवर', 'वस्त्रहरण' आणि 'सह्याद्रिवर्णन' हे ग्रंथ महानुभाव संप्रदायात मान्य आहेत.

13. *"देवाचेया दादुलेपनाचा उबारा: न साहावेचि सातांही सागरा : भेण वोसरोनि राजभरा : दीधली द्वारावती" तिचा अर्थ : "देवाचे म्हणजे श्रीकृष्णाच्या पराक्रमाचे तेज सात सागरही सहन करू शकले नाही. त्यांनी श्रीकृष्णाला घाबरून माघार घेतली आणि द्वारका दिली." देवाचे – श्रीकृष्णाचे, दादुलेपनाचा – पराक्रमाचा, उबारा – उष्णता, तेज; न साहावेचि – सहन झाले नाही, सातांही – सात, भेण – घाबरून, वोसरोनि – ओसरणे , कमी होणे, राजभरा – श्रीकृष्ण, दीधली - दिली, द्वारावती - द्वारका :* स्मृतिस्थळ पान ४७ , स्मृति क्र.११३, महानुभव आश्रम, सातारा, शताब्दी महोत्सव ५ व ६ मे, २०१२; संदर्भ ग्रंथ संपादक : वा. ना. देशपांडे, डॉ. व. वि. पारखे, डॉ. प्रा. रमेश आवलगावकर

14.

**इतर टीपा :**

15. **होमर** (Homer) हा प्राचीन ग्रीक महाकवी होता. त्याने इलिअड (*Iliad)* आणि ओडेसी *(Odyssey) ही दोन महाकाव्ये लिहिली. युरोपियन साहित्यविश्वाचा तो पहिला लेखक मनाला जातो.* होमरचा काल अनिश्चित आहे. अंदाजे इसवी सन पूर्व ८५० ते १२५० हा त्याचा काळ असावा. वेगवेगळया इतिहासकारांनी विविध मते नोंदविली आहेत. प्लेटोने (इ.स.पू. ४२८ ते इ.स.पू. ३४८ अंदाजे) त्याच्या 'रिपब्लिक' या ग्रंथात प्राचीन ग्रीकांना होमर किती महत्वाचा होता, याचे सविस्तर वर्णन केले आहे. "शोकांतिकेचा पहिला अध्वर्यू", "ज्ञानाचा नेता" आणि "याने ग्रीसला शिकविले" अशा शब्दात प्लेटो होमरचे चित्र रेखतो. होमरच्या बहुतेक सर्व लेखनापैकी अर्धे लेखन पपायरस झाडाच्या पानावर लिहिलेले इजिप्तमध्ये सापडले.

16. **एडवर्ड यंग** (Edward Young ) (०३ जुलै १६८३-०५ एप्रिल १७६५) हा इंग्लिश कवी होता. त्याच्या Night thoughts on life, death, and immortality ; and, A paraphrase on part of the Book of Job *या मुळे तो प्रसिद्ध झाला. त्याने १७५९ साली सम्युएल रिचर्डसन या अन्य लेखकाला* Conjectures on original composition in a letter to the author of Sir Charles Grandison ... या नावाचे एक दीर्घपत्र लिहीले. त्यात त्याने वाङ्मयचोरीचा धिक्कार करून साहित्यची 'अस्सलता' य गुणाचा गौरव केला. तथापि हा संदर्भ देताना लेखक लिंचने एक चूक केली आहे. त्याने या पत्राचे नाव Conjectures Concerning Original Composition असे दिले आहे; ते मुळात

Conjectures on original composition in a letter to the author of Sir Charles Grandison ... असे आहे. यंगचा मित्र सम्युएल रिचर्डसन याने १७५३ साली Sir Charles Grandison या नावाची कादंबरी लिहिली. त्यास उद्देशून यंगने हे पत्र लिहिले होते. त्यात तो नकला आणि अस्सलता (Originality) याची चर्चा करतो.

17. नकला आणि अस्सलता हा मुद्दा युरोपात १८ व्या शतकात पुढे आला. अद्‌भुतरम्यतावादी चळवळीत 'अद्‌भुतरम्य अस्सलता' (romantic originality) या नावाने ही संकल्पना आली. शेक्सपिअरच्या काळात आधीच अस्तित्वात असलेल्या कोणत्यातरी साहित्यकृतीचा आधार घेऊन लिहिणे, म्हणजे "एखाद्या साहित्यात व आपल्या लेखनात साम्य आढळले तरी त्यात गैर न मानणे" मंजूर होते. खुद्द शेक्सपिअरने कोणतेही "अनावश्यक नावे लेखन शोध" केले नाहीत. हा मुद्दा प्रथम एडवर्ड यंगने उपस्थित केला. तो साहित्य विश्वात अग्रभागी राहिला. विसाव्या शतकात अलेक्झांडर लिंडे या लेखक समीक्षकाने "Plagiarism and Originality" हे पुस्तक १९५२ साली लिहिले, ते आजही प्रस्तुत आहे.

18. **मिशेल डी मॉन्तेन** (२८ फेब्रुवारी १५३३ – १३ सप्टेंबर १५९२) हा फ्रेंच प्रबोधनकाळातील एक महत्वाचा आणि अत्यंत प्रभावी तत्त्ववेत्ता होता. त्याने लिहिलेले 'निबंध' (The Essay) युरोपीय साहित्यविश्वात परिणामकारक ठरले आहेत.

19. **बेन जॉन्सन** (Ben Jonson) बेन बेन्जामिन जॉन्सन (११ जून १५७२ – ०६ ऑगस्ट १६७३) हा प्रसिद्ध नाटककार, कवी, अभिनेता आणि समीक्षक होता. शेक्सपिअरनंतरचा सर्वात प्रभावी आणि महत्वाचा इंग्लिश नाटककार समजला जातो. त्याचवेळी त्याने शेक्सपिअरवर केलेल्या टोकदार टीकेमुळे त्याला शेक्सपिअरचा शत्रू मानले जाते! शेक्सपिअरनंतर नऊ वर्षांनी त्यांचा जन्म झाला. तो अतिशय बुद्धिमान पण भांडखोर होता. रंगमंचावर अभिनय करताना त्याने द्वंद्वयुद्धाच्या प्रसंगात दोन नटांना खरेच मारून टाकले.

20. **सम्युएल जॉन्सन**) Samuel Johnson ( ,(१७८४-१७०९)लेखक ,संपादक ,कवी , ,समीक्षकपत्रकार आणि शब्दकोशकार , व्युत्पत्तितज्ज्ञ याला डॉ. जॉन्सन नावाने ओळखले जाते .नऊ वर्षांच्या अथक श्रमानंतर त्याने एकट्याने *A Dictionary of the English Language* हा शब्दकोश १७५५ साली सिद्ध केला . त्यानंतर१५० वर्षांनी *Oxford English Dictionary* प्रसिद्ध होईपर्यंत जॉन्सनचा शब्दकोश हाच प्रमाण मनाला जात होता. त्याने *The Plays of William Shakespeare हे टीकात्मक पुस्तक १७६५ साली लिहिले* .त्यानंतर *The Lives of the Poets या पुस्तकात त्याने अनेक कवींची चिकित्सा केली .*

21. **अलेक्झांडर लिंडे** (Alexander Lindey), (१८९६ – ११ नोव्हेंबर १९८१) कायदेतज्ञ आणि प्रताधिकार, सेन्सॉरशिप आणि वाङमयचौर्य या विषयावरील क्रमिक पुस्तकांचे लेखक. त्यांचा जन्म बुडापेस्ट येथे झाला आणि मृत्यू न्यूयॉर्क येथे झाला. त्यांचे "Plagiarism and Originality" हे १९५२ साली प्रसिद्ध झालेले पुस्तक वाङमयचौर्य या विषयवार आहे.

22. **अलेक्झांडर पोप** (Alexander Pope), (२१ मे १६८८ – ३० मे १७४४), उपहास लेखनाबद्दल प्रसिद्ध ब्रिटीश कवी, होमरच्या लेखनाचे भाषांतर करणे, हे त्याचे ध्येय होते. the heroic couplet या नावाने ओळखल्या जाणाऱ्या काव्य प्रकाराबद्दल पोप प्रसिद्ध आहे. त्याचे परंपरा लेखक, कवी, तत्त्ववेत्ते आणि तत्कालिन समाज जीवन, बौद्धिक जीवन इत्यादिविशायीचे त्याचे निरीक्षण अफाट होते. तो मार्मिक आणि काव्यात्म टीकेमुळे प्रसिद्धीस आला.
23. **मार्शल** : प्राचीन रोमन कवी मार्क्युज वेलरिअस मार्शलीस (Marcus Valerius Martialis ), (जन्म :अंदाजे मार्च ३८ ते ४१ ,मृत्यू : १०२ ते १०४) त्याचा जन्म हिस्पानिया प्रांतात ऑगस्टस बिब्लीस या गावात झाला. इंग्लिश विचारविश्वात 'मार्शल ' (Martial) नावाने प्रसिद्ध आहे . ज्यास आधुनिक काळात *Epigrams* चुटका म्हणतात त्याचा तो जनक मानला जातो. मराठीत त्याचे भाषांतर साधारणतः "कोरीव काव्यात्म सूत्र" असे करता येईल. अर्थात त्यातून *Epigrams* चा पूर्ण अर्थ व्यक्त होऊ शकेल असे नाही. सम्राट डोमिशियान ,नर्व्हा आणि ट्राजन यांच्या कालखंडात इ.स .८६ ते १०३ दरम्यान त्याचे *Epigrams* चे बारा खंड प्रसिद्ध झाले. या छोट्या कवितांमध्ये त्याने त्याचे परिचित श्रीमंत मित्र, धनिक मंडळी आणि भानगडबाज सत्ताधिकाऱ्यांचे तसेच रंगेल व रगेल समाजजीवनाची खिल्ली उडविली. त्याच्या *Epigrams* त त्याकाळात उगम पावलेल्या अद्भुतरम्यतावादाचे चित्र रंगविले आहे. मध्युगात युरोपियन प्रबोधनकाळात मार्शलच्या काव्यप्रतिभेचा नव्याने शोध लागला. त्याच्या काव्यात प्रबोधनकालीन कवी, लेखक, चित्रकार, कलाकार मंडळीना नव्या प्रेरणा आढळल्या. त्याची निर्मिती मूल्यवान ठरली. ज्युव्हेनाल , उत्तरकालीन अभिजात साहित्य , कोलोनगीयान पुनरुज्जीवन ,फ्रान्स आणि इटलीतील प्रबोधन ,सिगलो डॉ ओर्डो आणि आधुनिक इंग्लिश आणि जर्मन काव्य यावर मार्शलचा मोठा प्रभाव होता. तो अद्भुतरम्यतावादी चळवळीच्या काळात ओसरला. त्याचा एक प्रसिद्ध चुटका किंवा एक वाक्य असे : " तुम्ही लिहिलेले तुमचे पान तुमच्याविरुद्ध उभे आहे आणि ते तुम्हाला सांगते आहे की तुम्ही चोर आहात! "
24. **गोविंद बल्लाळ देवल** (१८५५- १९१६) : यांनी १८८९ साली 'मृच्छकटिक' चे प्रयोगाला अनुकूल असे मराठी रूपांतर केले. ते रंगभूमीवर लक्षवेधी ठरले.
25. **परशुरामपंत तात्या गोडबोले** (१७९९-१८७४) : यांनी मृच्छकटिक भाषांतरित केले.
26. **दंडी** (जन्म: पाचव्या शतकाचा उत्तरार्ध ते सहाव्या शतकाचा पूर्वार्ध किंवा सातव्या शतकाचा उत्तरार्ध ते आठव्या शतकाचा पूर्वार्ध अंदाजे): हा संस्कृत भाषापंडित, साहित्यिक आणि कवि होता. त्याच्या तीन प्रमुख साहित्यकृतीआहेत : 'काव्यादर्श', 'दशकुमार चरित' आणि 'अवंतिसुन्दरी कथा':
27. **आर्थर बेरिडेल कीथ** (Arthur Berriedale Keith), (जन्म : ५ एप्रिल १८७९, मृत्यू : ०६ ऑक्टोबर १९४४): विख्यात प्राच्यविद्याविशारद, ऑक्सफर्ड विद्यापीठात संस्कृत आणि पाली ह्या भाषांचे तसेच प्राच्यविद्यांचे अध्ययन. १९१४ पासून एडिंबरो विद्यापीठात संस्कृत आणि तौलनिक भाषाशास्त्र ह्या विषयांचे अध्यासनस्थ प्राध्यापक म्हणून हयातभर त्यांनी काम केले.

28. **राजशेखर** (नववे व दहावे शतक किंवा ९३०-९७७? अथवा ८८० ते ९२० ?): प्रसिद्ध कवि, नाटककार, हा नाटककार कमी आणि कवि जास्त होता. तो महाराष्ट्रीय (क्षत्रिय) होता.
29. **हिरण्याक्ष** : हिरण्याक्ष = हिरण्य म्हणजे सोने, अक्ष म्हणजे डोळा. म्हणून हिरण्याक्ष = सोन्यावर खिळलेली दृष्टी.
30. **क्षेमेन्द्र** ( जन्म : अज्ञात, मृत्यू : १०७० अंदाजे ) : काश्मिरी संस्कृत पंडित, प्रतिभासंपन्न महाकवि; काश्मिरचे राजे नरेश अनंत (१०२८-१०६३) आणि त्याचा पुत्र व उत्तराधिकारी राजा कलश (१०६३-१०८९) यांचा दरबारीकवी होता. एका प्रभावशाली, वैभवसंपन्न, सनातनी, उच्च ब्राह्मण कुटुंबात त्याचा जन्म झाला. ) क्षेमेन्द्राची मुख्य रचना म्हणजे "समयमातृका" आणि "दशावतारचरित". "समयमातृका" हे एका वेश्येचे आत्मवृत्त असून, तत्कालिन समाजाच्या छुप्या जीवनावर प्रकाश टाकते. त्यात आठ अध्याय आहेत. त्यात वेश्याजीवनाचे चित्रण असून वेश्यांपासून बचाव कसा करावा, याचे प्रशिक्षण आहे
31. 'दुकूलचोर' दुकूल = √दु+ऊलच्, कुक्. अर्थ= १. जवसापासून बनविलेला कपडा. २. महागडे कपडे. ३. स्त्रियांचे कपडे.
32. स्कंन्न किंवा स्कन्न (वाळून गेलेले) : गीर्वाणलघुकोश, कै. जनार्दन विनायक ओक (एम. ए.)
33. **मॉरीस ब्लूमफिल्ड** (Maurice Bloomfield, जन्म : २३ जानेवारी १८५५, मृत्यू : १२ जून १९२८): पीएच. डी. , एल. एल. डी., अमेरिकन भाषाकोविद आणि संस्कृततज्ज्ञ. ब्राँम् फिल्ड की Maurice Bloomfield ?: या विद्वानाच्या मराठी उच्चाराबाबत (लिप्यंतरण बाबत) मला भेद आढळतो. ज्या पंडीत महादेवशास्त्री जोशी संपादित भारतीय संस्कृतिकोश ( खंड ३, पान ४७९) मधून मी ही माहिती मिळविली ती नोंद आणि या प्रस्तुत माहितीचा मूळस्रोत असलेल्या श्री. व्यं. केतकरांचा महाराष्ट्रीय ज्ञानकोश, या दोन्ही कोशात या विद्वानाचा उच्चार 'ब्राँम् फिल्ड' असा आहे. तथापि डॉ. यशवंत रायकर यांच्या 'लोकप्रभा' मधील लेखात (भारतीय स्तेयशास्त्र, डॉ. यशवंत रायकर, http://www.lokprabha.com/20091120/sanskriti01.htm) 'मॉरिस ब्लूमफिल्ड' असा केला आहे. शंका येवून मी महाजालावर शोध घेतला तेंव्हा कोशातील उच्चार चुकीचा असल्याचे लक्षात आले. तरीही पुन्हा खात्री करून घेण्यासाठी त्या 'ब्राँम् फिल्ड' ची विविध स्पेलिंगे करून नावाने शोध घेतला तेंव्हा अशा उच्चाराच्या नावाचा कुणी लेखक नाही, असे लक्षात आले. Maurice Bloomfield या नावापुढे मात्र इंग्लिश विकिपेडीयावर माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे संदर्भीय दोन्ही कोशातील उच्चार चुकीचा आहे, आणि रायकर यांचा उच्चार व संदर्भ अचूक आहे; हे मी येथे अधोरेखित करतो.
34. **कर्तिकेय:** हिंदू पुराणकथांतील शिव-पार्वतीचा जेष्ठ पुत्र व देवांचा सेनापती. त्याच्या जन्माबाबत पुराणांत विविध कथा आहेत. रामायणात तो अग्नी व गंगा यांचा पुत्र असल्याचे म्हटले आहे. त्याची इतर नावे :

    स्कंद, कुमार, षडानन, अंगार, सेनानी, देवसेनापती, अग्निभू, व्दादशकर, गुह, गंगा-पुत्र, महासेन, मंगळ (ग्रह), शक्तिधर, सिद्धसेन विशाख इ . या नावांनी त्याचेबरेच उल्लेख आढळतात. कृत्तिकांनी त्याचा प्रतिपाळ केला म्हणून त्याला कार्तिकेय नाव आहे .दक्षिण भारतात त्याला मुरुग (मूरुगण)

अथवा सुब्रह्मण्य असे नाव आहे .त्याच्या विविध मूर्तीही आहेत. तो युद्धदेव मानला जातो. दक्षिण भारतात मात्र तो विद्येचा देव मानला गेला. देवांचे सेनापतीत्व करुन त्याने तारकासुर व महिषासुर ह्या दैत्यांचा वध केल्याच्या कथा पद्म, मत्स्यादी पुराणांत तसेच महाभारतात आहेत.

35. **विल्सन मीन्झर** (Wilson Mizner), (जन्म: १९ मे १८७६, मृत्यू : ०३ एप्रिल १९३३): अमेरिकन नाटककार, संवादतज्ज्ञ आणि उद्योजक. त्याने लिहिलेले *दी डीप पर्पल* (*The Deep Purple*) हे नाटक १९१० मध्ये रंगभूमीवर आले आणि तो प्रसिद्धीच्या झोतात आला. तो आणि त्याचा भाऊ ॲडीसन मीन्झर यांनी मिळून अनेक घोटाळे आणि भानगड केल्या; त्या इतक्या लक्षवेधी ठरल्या की त्यावर स्टीफन सोन्धीम्स या निर्मात्याने 'वाईज गाईज, गोल्ड !' (*Wise Guys, Gold!* )आणि 'बाउन्स' (*Bounce) नावाचा* रोड शो केला. १९३१ च्या दरम्यान वॉर्नर ब्रदर्सचा प्रमुख डेरिल झानुक याने विल्सन मीन्झरला सर्वोत्तम पटकथा लेखक म्हणून नियुक्त केले. शिवाय त्याला अधिकचे उत्पन्न म्हणून लॉस एंजेलिस येथे 'दी ब्राऊन डर्बी' हे महागडे रेस्टॉरंट वॉर्नर ब्रदर्स काढून दिले.
36. हयग्रीव: घोड्याचे मस्तक (हयवदन). हयग्रीव = हर् धातू, म्हणून निष्पन्न अर्थ = हरण करने, ग्रीव = गृ धातु , म्हणजे ज्ञान. म्हणून हयग्रीव (हरग्रीव) चा अर्थ होतो, " ज्ञान हरण करणारा, ज्ञानप्रेमी अर्थात् ज्ञानाभिमानी : हयग्रीव हा असुर होता, त्याला त्याच्या असुरी ज्ञानाचा अभिमान होता.
37. मत्स्यावतार : मत्स्य = मद् + स्य. 'मद्' हे सर्वनाम, त्याचा अर्थ 'मी' शी संबंधित आणि 'स्यम्' चा अर्थ आहे – चिंतन. म्हणून मत्स्य = 'मी' शी संबंधित चिंतन म्हणजेच " मी आत्मा आहे! " . म्हणून मत्स्य = आत्मचिंतन.